सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २९ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ७११३ कोटींसह भाजप सर्वांत श्रीमंत पक्ष

### काँग्रेसकडे ८५७.१७ कोटी रुपयांचा निधी : निवडणूक आयोगाने दिली आकडेवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नवी दिल्ली**

जगातील सर्वांत मोठा राजकीय पक्ष अशी स्वत:ची ओळख करून देणारा भाजप हा देशातील सर्वांत श्रीमंत राजकीय पक्ष बनला असून ३१ मार्च २०२४ पर्यंतच्या आकडेवारीनुसार त्याच्याकडे ७११३.८० कोटी रुपयांचा निधी आहे, तर काँग्रेसकडे ८५७.१७ कोटी रुपयांचा निधी असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

भाजपने २०२३-२४ या कालावधीत १७५४.०६ कोटी रुपये खर्च केले. २०२२-२३ या कालावधीत भाजपने केलेल्या १०९२ कोटी रुपये इतक्या खर्चाच्या तुलनेत २०२३-२४ मध्ये खर्चात ६० टक्के वाढ झाली, तर काँग्रेसने २०२३-२४मध्ये ६१९.६७ कोटी रुपये खर्च केले. २०२२-२३मध्ये हे प्रमाण १९२.५६



कोटी रुपये होते. निवडणूक आयोगाला सादर केलेल्या वार्षिक अहवालानुसार २०२३-२४मध्ये भाजपला निवडणूक रोख्यांच्या रूपाने १६८५.६९ कोटी रुपयांच्या ऐच्छिक देणग्या मिळाल्या. हेच प्रमाण २०२२-२३मध्ये १२९४.१५ कोटी रुपये होते. निवडणूक रोख्यांवर आता सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. २०२३-२४या वर्षामध्ये भाजपला सर्व मिळून २०४२.७५ कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या. काँग्रेस पक्षाला २०२३-२४मध्ये १२२५.११ कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या.

**काँग्रेसचा भारत जोडो यात्रा-२ वर ४९.६३ कोटींचा खर्च**

काँग्रेसच्या भारत जोडो यात्रा २ च्या आयोजनासाठी २०२३-२४ या कालावघीत ४९.६३ कोटी रुपये, तर त्याआधीच्या भारत जोडो यात्रेवर ७१.८४ कोटी रुपयांचा खर्च पक्षाने केला होता.

**भाजपचा जाहिरातींवर ५९१ कोटींचा खर्च**

२०२३-२४मध्ये भाजपने जाहिरातींवर ५९१ कोटी रुपये खर्च केले. त्यातील ४३४.८४ कोटी इलेक्ट्रॉनिक माध्यमातील व ११५.६२ कोटी रुपये मुद्रित माध्यमांतील जाहिरातींवर खर्च झाले.

पक्षाने २०२३-२४ या वर्षात हेलिकॉप्टर, विमान प्रवासासाठी १७४ कोटी रुपयांचा खर्च केला. भाजपने या वर्षात उमेदवारांना १९१.०६ कोटी रुपयांची मदत केली. भाजपने २०२४मध्ये सभांच्या आयोजनासाठी ८३.३२ कोटी रुपये तर मोर्चे, आंदोलने, कॉल सेंटर आदी गोष्टींकरिता ७५.१४ कोटी खर्च केले.

## मुख्यमंत्र्यांनी राजीनामा मागितला तर मी राजीनामा देईल; धनंजय मुंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बीड**



नैतिकतेतून मी दोषी वाटत नाही, पण जर मुख्यमंत्र्यांना मी दोषी वाटत असेल तर त्यांनी राजीनामा मागावा. मुख्यमंत्र्यांनी तशी मागणी केली तर मी राजीनामा देण्यास तयार आहे,असं विधान दिल्ली दौऱ्यावर असलेले धनंजय मुंडे यांनी केलंय. सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील दोषींना फासावर चढवा, असेही राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे म्हणालेत.

धनंजय मुंडे यांच्यावर आरोप होत आहेत. हत्येप्रकरणात धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडला अटक झालीय. कराडमुळे धनंजय मुंडे अडचणीत सापडले आहेत. दरम्यान याप्रकरणी विरोधी पक्षांकडून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली जात आहे. त्याचदरम्यान धनंजय मुंडे हे दिल्ली दौऱ्यावर गेले आहेत. त्यामुळे ते राजीनामा देणार, असा अंदाज वर्तवण्यात येत होता. आज दिल्लीला धनंजय मुंडे यांना प्रल्हाद जोशी यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. जर मुख्यमंत्र्यांना मी दोषी वाटत असेल तर मी राजीनामा देण्यास तयार आहे. परंतु नैतिकतेतून मी दोषी वाटत नसल्याचंही धनंजय मुंडे यावेळी म्हणालेत.

## प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी अनेक भाविक जखमी, अमृत स्नान रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९प्रयागराज**

उत्तर प्रदेशमधीलप्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी झाल्याची घटना घडली आहे. महाकुंभ मेळ्यामध्ये त्रिवेणी संगमावर आज (बुधवार) मौनी अमावस्येला अमृत स्नान करण्यासाठी मोठ्या संख्येने लोक आले आहेत. दरम्यान, काल रात्रीच्या सुमारास संगमावर गर्दी इतकी मोठी झाली. त्यामुळे चेंगराचेंगरीसारखी स्थिती निर्माण झाली. या चेंगगरीत अनेक जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज (बुधवार) महाकुंभमेळ्यातील मौनी अमावस्येचे अमृत स्नान आहे. यानिमित्त मोठ्या संख्येने संगमावर लोक आले आहेत. यावेळी गर्दी मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे चेंगराचेंगरी झाली. संगम किनाऱ्यावर रात्री २ वाजताच्या सुमारास ही चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत अनेक जण जखमी झाले आहेत. जखमींना याठिकाणी उपस्थित असलेल्या रुग्णवाहिकांद्वारे महाकुंभ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर महाकुंभमेळा प्रशासनाने आखाडा परिषदेला



अमृत स्नान थांबवण्याचे आवाहन केले आहे. महाकुंभमेळा प्रशासनाने आखाडा परिषदेचे अध्यक्ष रवींद्रपुरी यांना आखाड्यांचे अमृत स्नान सध्या तरी थांबवण्याचे आवाहन केले आहे. त्यानंतर हे अमृत स्नान सध्या तरी थांबवण्यात आले आहे. तसेच, सर्व आखाडे आपल्या छावण्यांमध्ये परतत आहेत. त्याच वेळी, आखाड्यांच्या विशेष मार्गांनी सामान्य लोकांना बाहेर काढले जात आहे.

दरम्यान, प्रयागराजमध्ये १३ जानेवारीपासून महाकुंभमेळ्याची सुरूवात झाली आहे. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी देशभरातून आणि परदेशातून लाखो भाविक प्रयागराजला गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती नदीच्या संगमावर येत आहेत. सरकारचा अंदाज आहे की, यावर्षीच्या महाकुंभमेळ्याला ४० कोटीहून अधिक लोक भेट देणार आहेत.

**वसंत पंचमीला स्नान करण्यासाठी या - रवींद्र पुरी**

जी घटना घडली, त्याबद्दल आम्हाला खूप दु:ख आहे. आमच्यासोबत हजारो भाविक होते. लोकांचा विचार करून आज आखाडे स्नानात सहभागी होणार नाहीत, असा आम्ही निर्णय घेतला आहे. मी लोकांना आजच्या ऐवजी वसंत पंचमीला स्नान करण्यासाठी येण्याचे आवाहन करतो. ही घटना घडली कारण भाविकांना संगम घाटावर पोहोचायचे होते. त्यामुळे भाविकांना आवाहन करतो की, त्यांनी पवित्र गंगा जिथे दिसेल तिथे स्नान करावे, असे अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष रवींद्र पुरी यांनी म्हटले आहे.

## न्यायाधीशांना मारण्यासाठी विष मिसळलं जाईल का?

### युमनेच्या पाण्यावरुन पंतप्रधान मोदींनी केजरीवालांना सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नवी दिल्ली**

आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी हरियाणा सरकार यमुना नदीचे पाणी जाणूनबुजून प्रदूषित करत असल्याचा आरोप केला होता. हरिणातील भाजप सरकार यमुना नदीचे पाणी प्रदूषित करून दिल्लीत पाठवत असल्याचा आरोप केजरीवालांनी केला. अरविंद केजरीवाल यांनी यमुना नदीच्या पाण्यावरून केलेल्या वक्तव्यावरुन भाजपने आक्रमक पवित्रा घेतला आहे. दुसरीकडे आता यमुनेचे पाणी दूषित केल्याचा दाव्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. मी सुद्धा यमुनेचे पाणी पितो असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

करतार नगर येथील संकल्प सभेला बोलताना पंतप्रधान मोदींनी यमुनेच्या पाण्यावरून आम आदमी पक्षाच्या सरकारला धारेवर धरले. त्यांची बोट यमुनेतच बुडेल असं पंतप्रधान मोदी म्हणाले. यमुनेत विष मिसळल्याच्या दाव्याला हरियाणाचा अपमान असल्याचे म्हणत पंतप्रधान मोदींनी, तेही तेच पाणी पितात, न्यायाधीश



आणि परदेशी राजदूतही तेच पाणी पितात, त्यांना मारण्यासाठी विष मिसळले जाईल का? असा सवाल केला.

राजकीय स्वार्थासाठी या गुन्हेगारांनी आणखी एक गंभीर पाप केले आहे. हे पाप कधीही माफ होणार नाही. इतिहासही त्यांना कधीच माफ करणार नाही. आज तुमच्या शिष्यांनी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला, तुमच्या इको-सिस्टमने ते लपवण्याचा प्रयत्न केला तरी देश मात्र हे विसरू शकणार नाही, दिल्लीही विसरू शकणार नाही. हरियाणातील प्रत्येकजण हे विसरू शकत नाही. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्र्यांनी हरियाणातील जनतेवर घृणास्पद आरोप केलेत. पराभवाच्या भीतीने ते हैराण झालेत. हरियाणातील लोक दिल्लीपेक्षा वेगळी आहेत का? हरियाणातील लोकांची कुटुंबे आणि मुले दिल्लीत राहत नाहीत का? हरियाणातील लोक त्यांच्या मुलांच्या पाण्यात विष मिसळू शकतात का?, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.गेल्या ११ वर्षांपासून पंतप्रधानही हेच पाणी पितोय. हरियाणावरुन पाठवलेलं पाणी दिल्लीत राहणारे न्यायाधीश, सर्व आदरणीय सदस्य, परदेशी राजदूतही पितात. हरियाणातील भाजप सरकारने मोदींना विष देण्यासाठी पाण्यात विष टाकले आहे, असे कोणी विचार तरी करू शकेल का? काय म्हणताय तुम्ही? देशातील न्यायाधीशांना विष पाजून मारण्याचा कट केला जातोय का?, असा सवालही पंतप्रधान मोदींनी केला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची दिल्लीतील प्रचाराच्या मैदानात उडी, तीन दिवसांचा कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, प्रचारासाठी मोजकेच दिवस राहिले आहेत. सर्वच पक्षांनी दिल्लीत ताकद पणाला लावली असून, भाजपनेही प्रचारकांची फौज मैदानात उतरवली आहे. भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही जाणार आहेत. तीन दिवस मुख्यमंत्री फडणवीस दिल्लीत असणार आहेत.



दिल्लीत सत्ताधारी आप, भाजप आणि काँग्रेस अशी तिरंगी लढत होत आहे. पुन्हा एकदा सत्ता राखण्यासाठी आपने सर्वस्व पणाला लावले आहे, तर दुसरीकडे भाजपने दिल्लीचा गड मिळवण्यासाठी प्रचारात झोकून दिल्याचे दिसत आहे. भाजपच्या स्टार प्रचारकांच्या यादीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही समावेश आहे. दावोस दौऱ्यामुळे त्यांना दिल्लीतील प्रचाराला जाता आले नाही. आता अखेरच्या टप्प्यात ते प्रचाराच्या मैदानात उतरणार आहेत.

**मुख्यमंत्री फडणवीस तीन दिवस दिल्लीत**


महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवारपासून म्हणजेच २९ ते ३१ जानेवारी असे तीन दिवस दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारासाठी जाणार आहेत.२९ जानेवारी रोजी दिल्लीतील रोहिणीतील सेक्टर ९ मधील डीसी चौक येथे त्यांची प्रचारसभा होणार आहे. त्यानंतर पहाडगंज भागात मराठी प्रकोष्ठ बैठकीला ते उपस्थित राहणार आहेत. ३० आणि ३१ जानेवारी रोजी सुद्धा त्यांच्या दिल्लीत प्रचारसभा होणार आहेत. दिल्लीत भाजपच्या इतर राज्यातील मुख्यमंत्र्यांच्याही प्रचारसभा झाल्या आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही दिल्लीत भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेतल्या. हरयाणाचे भाजपचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनीही दिल्लीत प्रचारसभा घेतल्या आहेत.

## देवेंद्र फडणवीस 'E-Office' मधून कसं चालवतात सरकार?; बावनकुळेंनी थोडक्यात सांगितले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

मुख्यमंत्र्यांनी सरकार वाऱ्यावर सोडलं आहे. त्यांचे दौरेच सुरू असतात असा आरोप विरोधकांकडून केला जात होता. त्यावरून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले. देवेंद्र फडणवीस ई ऑफिसमधून उत्तम प्रकारे प्रशासन चालवतात. महाराष्ट्राचा विकास आणि इतर राज्याचा विकास विरोधकांनी बघितला पाहिजे. राज्याने कोणकोणत्या यशस्वी योजना दिल्यात हे पाहिले पाहिजे. देवेंद्र फडणवीस सरकार देशात सर्वोकृष्ट कामकाज करतंय असं त्यांनी म्हटलं.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्राच्या इतिहासातलं १४-१९ या काळापेक्षा अधिक उत्तम आणि १०० पट जास्त काम करणारं सरकार देवेंद्र फडणवीस करतायेत. ते या राज्याला मोदींच्या संकल्पनेला शोभणारं काम करतायेत. देवेंद्र फडणवीस २४ तास ३६५ दिवस शासनाकडे लक्ष ठेवून आहेत. त्यांचा पूर्ण वेळ, एक एक मिनिटे आदेश पारित करण्यासाठी राहतो. त्यांचा मोबाईल जनतेसाठी



आणि शासनासाठी उपलब्ध आहे. आजही ३-४ निर्णय त्यांनी तात्काळ मोबाईलवरून आणि त्यांच्या ई ऑफिसमधून घेतले आहेत. देवेंद्र फडणवीस ई ऑफिस चालवतायेत. त्यातूनही राज्य चालवता येते असं बावनकुळेंनी सांगितले.

तसेच दावोस दौऱ्यावर असतानाही फडणवीसांनी ई ऑफिसमधून काम केले. आता दिल्लीतून ते काम करतायेत. कुठलाही शासन निर्णय अडत नाही. शासनाचे काम थांबत नाही. १ तासाच्या प्रवासात देवेंद्र फडणवीस चारदा मोबाईल बघून राज्यात काय सुरू आहे. कोणत्या शासन आदेशाची गरज आहे ते ई ऑफिसमधून पाहतात असं मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं.

**सुप्रियाताईंनी राज्याची बदनामी करू नये**

दरम्यान, सुप्रिया सुळेंनी अभ्यास केला पाहिजे. इतर राज्याची तुलना महाराष्ट्राशी करू नये. महाराष्ट्रात राहून महाराष्ट्राची बदनामी करू नये. महाराष्ट्राचा विकास आणि इतर राज्याचा विकास त्यांनी पाहिला पाहिजे. महाराष्ट्राने काय काय योजना दिल्यात, यशस्वीरित्या पोहचवल्यात ते पाहिले पाहिजे. नीती आयोगाचा कुठल्या वर्षाचा आकडा आहे माहिती नाही. परंतु देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र सरकार देशात सर्वोकृष्ट कामगिरी करतंय. सुप्रिया सुळेंनी राज्याची बदनामी करू नये असा टोला बावनकुळेंनी लगावला.

## रायगडला बर्ड फ्ल्यूचा धोका वाढला झटपट हजारो अंडी आणि कोंबड्या नष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९रायगड**

राज्यात पुन्हा एकदा बर्ड फ्ल्यूने डोकं वर काढलं आहे. ठाण्यानंतर आता रायगड जिल्ह्यात बर्ड फ्ल्यूचा कहर वाढला आहे. उरणमधील चिरनेर येथील काही कोंबड्यांना बर्ड फ्ल्यूची लागण झाल्याचं आढळल्याने हजारो कोंबड्या मारण्यात आल्या आहेत. तसेच हजारो अंडीही नष्ट करण्यात आली आहे. तसेच चिरनेर परिसरातील गावांना कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. शहरात बर्ड फ्ल्यूचा धोका निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. तर कोंबडी आणि अंडी विक्रेत्यांवर मोठी संक्रात कोसळली आहे.

रायगड जिल्ह्यातील उरणच्या चिरनेर गावात कुक्कुटपालन करणाऱ्या व्यावसायिकांच्या कोंबड्याचा गेल्या काही दिवसांपासून अचानक मृत्यू होत आहे. त्यामुळे कुक्कुटपालन करणारे व्यावसायिक भयभीत झाले होते. अचानक कोंबड्या मरत असल्याने या व्यावसायिकांनी पशूपालन अधिकाऱ्यांना त्याबाबतची माहिती दिली. या अधिकाऱ्यांनी पोल्ट्रीची पाहणी करून भोपाळ आणि पुण्याला या कोंबड्यांचे सँपल तपासणीसाठी पाठवले. त्याचा अहवालही आला आहे. त्यात यातील काही कोंबड्यांचा मृत्यू बर्ड फ्ल्यूने झाल्याचं आढळून आलं. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. त्यामुळे चिरनेर परिसरातील हजारो कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्यात आली आहेत. तसेच चिरनेर परिसरातील १० किलोमीटर अंतरावरील सर्व गावांना त्यांच्याकडील कोंबड्या आणि त्यापासून मिळालेली अंडी नष्ट करण्याचे आदेशच जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## संपादकीय ......

# एकाकी वाटचालीचे काँग्रेसपुढे आव्हान

कृष्णेकाठी पहिले कुंडल, आता उरले नाही राम गणेश गडकरी तथा गोविंदाग्रज यांची ही गाजलेली कविता. काँग्रेस पक्षाच्या सद्य:स्थितीला ही कविता तंतोतंत लागू पडते. एकशेचाळीस वर्षांच्या या पक्षाची सध्याची अवस्था कमालीची बिकट झाली आहे. इंडिया आघाडी नावाची आवळ्या-भोपळ्याची मोट केव्हाच फुटीच्या उंबरठ्यावर उभी आहे आणि पक्षाचे निकट म्हणवणारे मित्र हात सोडून जाण्याची आपत्ती केव्हाही ओढवू शकते. त्यामुळे काँग्रेस नेतृत्वाने धडाडीने काही हालचाली केल्या नाहीत, तर लवकरच या पक्षाला एकाकी वाटचाल करावी लागण्याची वेळ आली तर आश्चर्य वाटायला नको. लोकसभा निवडणुकीत थोडेफार यश मिळताच विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या शिडात उत्साहाचे वारे भरले होते. काँग्रेस पक्ष 'जितं मया'च्या आविर्भावात वावरत होता. पण महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक झाली आणि उत्साहाच्या फुग्याला टाचणी लागली. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममतादीदी, समाजवादी पार्टीचे नेते अखिलेश यादव, 'आप'चे नेते अरविंद केजरीवाल आदींनी आपले मुखवटे उतरून खरे चेहरे दाखवले. दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आप'ने स्वतंत्र लढण्याचे ठरवले. इंडिया आघाडी अधिकृतपणे फुटलेली नाही; पण वास्तवात ती राहिलेली नाही, हेच अधिक खरे आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला जबरदस्त धक्का बसला. पक्षाचे अनेक दिग्गज पराभूत झाले. अनेक ठिकाणचे गडकिल्ले बरखास्त झाले. कठीण समयात कोणी मित्र राहात नाहीत. काँग्रेसला तो अनुभव आता येत आहे. वास्तविक काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि मित्रपक्ष शिवसेना (उबाठा) यांच्या महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळवले होते; पण विधानसभा निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती होऊ शकली नाही. 'मविआ'ला अतिआत्मविश्वास नडला, असे म्हणता येईल आणि आता या आघाडीत बेबनावाचे वादळ सुरू झाले आहे. उबाठा शिवसेनेने स्वबळाची भाषा केली आहे आणि काँग्रेसचे नेतेही त्याच भाषेत उत्तर देत आहेत.

महाविकास आघाडीत असा सावळा गोंधळ सुरू असताना ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उबाठा शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या गाठीभेटी जाणकारांच्या भुवया उंचावणार्या आहेत. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने शरद पवार आणि अजित पवार यांची बंद खोलीत अर्धा तास चर्चा झाली. काका-पुतण्यांमध्ये एवढे रहस्य काय चालले आहे, याविषयी राजकीय अभ्यासकांत कुतूहल आहे. आगामी काही घडामोडीचे संकेत यातून मिळत आहेत का, अशी चर्चा सध्या जोर धरत आहे. शरद पवार यांच्या पेटंट कात्रजच्या खेळीची पुनरावृत्ती तर होणार नाही ना, असाही चर्चेचा सूर आहे. या घडामोडी होत असतानाच शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे एक आमदार सतीश चव्हाण यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे, तर शिंदे शिवसेनेचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी 'ऑपरेशन टायगर' राबवण्याची घोषणा केली आहे.केंद्रातील भारतीय जनता पक्षप्रणीत 'रालोआ' सरकारला बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या पक्षाचा पाठिंबा आहे. तथापि अलीकडे नितीशकुमार यांची चलबिचल चालल्याचे बोलले जाते. बिहार विधानसभेची निवडणूक चालू वर्षअखेर आहे. त्यादृष्टीने त्यांची तयारी चालू असताना केंद्रातील भाजपप्रणीत सरकारशी केलेली हातमिळवणी कितपत पथ्यावर पडेल, असाही नितीशकुमार यांचा हिशेब असेल, असे म्हटले जात आहे. मणिपूरमधील भाजप सरकारचा पाठिंबा काढून घेतल्याचे जाहीर केलेल्या नितीशकुमार यांनी मणिपूरच्या आपल्या पक्षाच्या प्रदेश अध्यक्षाची तातडीने उचलबांगडी करीत पेल्यातील हे वादळ संपवले. असे असले तरी नितीशकुमार यांची द्विधा मन:स्थिती लपून राहिलेली नाही.या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी नितीशकुमार यांच्या संदर्भात जे उद्गार काढले आहेत, ते मोठे सूचक आहेत. केंद्रातील भाजपप्रणीत सरकारचा पाठिंबा नितीशकुमार यांनी काढून घेतला, तरी केंद्रातील भाजपप्रणीत सरकारवर परिणाम होणार नाही, असे मत प्रदर्शन शरद पवार यांनी केले आहे. कोल्हापूर येथे त्यांनी हे विधान केले आणि त्यांच्या या विधानामागे नेमका काय अर्थ असावा, याविषयी तर्कवितर्कांना प्रारंभ झाला आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उबाठा शिवसेना यांच्यात अस्वस्थता असल्याची चिन्हे आहेत. त्यामुळे आगामी काळात या दोन्ही पक्षाचे नेते काय निर्णय घेतील, हे सांगणे कठीण आहे. एकीकडे अनेक राज्यांतून काँग्रेसच्या अस्तित्वाला ग्रहण लागले आहे. या पक्षाकडे आता तरुण कार्यकर्त्यांची वानवा जाणवू लागली आहे. एकेकाळी महाराष्ट्र हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता आणि संयुक्त महाराष्ट्राच्या उग्र जनआंदोलनातही हा बालेकिल्ला शाबूत राहिला होता.आता मात्र हा बालेकिल्ला ढासळलेला आहे. भाजपसारखा पक्ष सर्व पातळीवर आक्रमक आणि भक्कम होत चालला असतानाच काँग्रेसपुढे फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून उभारी घेण्याचे आव्हान आहे. ते पेलवले नाही, तर जोडलेले मित्रपक्ष हात झटकण्याच्या तयारीत असताना काँग्रेस पक्षाला एकाकीपणाचा सामना करावा लागणार आहे. त्याही आव्हानाला तोंड देता न आल्यास काँग्रेसचे भवितव्य काय राहील, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही.

# दूरदृष्टीबाधित व्यक्तींसाठी मोफत ई-व्हेईकल शॉप्स उपलब्ध

महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी करण्याच्या दृष्टीने हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याबाबतची योजना शासनामार्फत राबविली जात आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, मर्या. यांच्या स्तरावरुन सूरु आहे.

**योजनेचा उद्देश:** -या योजनेचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक सामाजिक पुनर्वसन करणे, सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे हा आहे.

**योजनेच्या अटी:**-या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच ४० टक्के किंवा त्याहून अधिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीच या योजनेसाठी पात्र आहेत. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

अर्जदाराकडे युडीआयडी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. मतिमंद अर्जदाराच्या बाबतीत त्यांचे कायदेशीर पालक अर्ज करण्यास सक्षम असतील. अर्जदार १८ ते ५५ वयोगटातील असणे आवश्यक आहे. त्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

अतितीव्र दिव्यांग व्यक्तींना वाहन चालविण्याचा परवाना नाकारला असल्यास, अशा परिस्थितीत देखील परवानाधारक नसलेल्या अतितीव्र दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत सोबत्याचा (Escort) सहाय्याने फिरता मोबाईल व्यवसाय करण्यास प्राधान्य दिले जाईल. लाभार्थी निवड करताना जास्त दिव्यांगत्व असलेल्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल. त्यामुळे निवडीचा क्रम हा अतितीव्र दिव्यांगत्व ते कमी दिव्यांगत्व या क्रमाने राहील. अर्जदार हा शासकीय,निमशासकीय,मंडळे ,महामंडळ यांचा कर्मचारी नसावा.

या योजनेसाठी अर्ज करणारा अर्जदार जर दिव्यांग वित्त विकास महामंडळाचा कर्जदार असल्यास तो थकबाकीदार नसावा. राज्यातील इतर कोणत्याही योजनेअंतर्गत मोफत ई-व्हेईकल प्राप्त झालेल्या दिव्यांग लाभार्थी या योजनेस अपात्र ठरविण्यात येईल. अर्जदाराने सर्व अटी मान्य असल्याचे तसे सबंधित वाहनाची योग्य ती काळजी घेण्याचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.

या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज २२ जानेवारीपासून सुरु असून ६फेब्रुवारी २०२५ पर्यंत सायंकाळी ६ वाजेपर्यंत केले जाऊ शकतात. यासाठीची लिंक https://register.mshfdc.co.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. माहितीसाठी हेल्पलाइन क्रमांक +९१ ९०९०११८२१८ वर संपर्क साधावा. या योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन , पोलीस आयुक्त कार्यालयाच्या मागे, अमरावती, दूरध्वनी क्रमांक ०७२१- २६६५९९३ यावर संपर्क साधावा.

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,अमरावती







## कॉलेस्ट्रॉलची पातळी नक्की किती वाढल्यास हार्ट अटॅकचा धोका संभवतो ? वाचा सविस्तर

दि.२९विदर्भ प्रजासत्ताक

कॉलेस्ट्रॉल हा आजकाल परवलीचा शब्द झाला आहे. हार्ट अटॅक आणि हृदयरोगात कॉलेस्ट्रॉल अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. पण कॉलेस्ट्रॉलची चांगली बाजूही आहे. पेशींची निर्मिती, हार्मोन्सची निर्मिती यासह इतर शारीरिक कार्यात कॉलेस्ट्रॉल महत्त्वाची भूमिका बजावते. पण याच कॉलेस्ट्रॉलचे वाढलेले प्रमाण हार्ट अटॅकचे कारणही बनू शकते. हे टाळण्यासाठी कॉलेस्ट्रॉलची शरीरातील योग्य मात्रा किती आहे हे आज जाणून घेऊ.



एलडीएल (लो डेन्सिटी लिपोप्रोटीन ) : बॅड कॉलेस्ट्रॉल किंवा आरोग्यास अपायकारक कॉलेस्ट्रॉल यालाच म्हणतात. हृदयातील ब्लॉकेजेसला कारणीभूत हेच कॉलेस्ट्रॉल असते. हे कॉलेस्ट्रॉल रक्त वाहिन्यांमध्ये साठून रक्तप्रवाहास अडथळा निर्माण करते. अर्थातच हार्ट अटॅकचे मुख्य कारण हे ब्लॉकेजेसच असतात.

एचडीएल (हाय डेन्सिटी लिपोप्रोटीन ): याला गुड कॉलेस्ट्रॉल म्हणले जाते. या कॉलेस्ट्रॉलच्या माध्यमातून बॅड कॉलेस्ट्रॉल शरीराबाहेर टाकले जाते.

**धोका कधी ?**

दोन्ही कॉलेस्ट्रॉलचे एकत्रित प्रमाण २०० मिलीग्राम प्रति डेसीलिटर पेक्षा जास्त असेल तर धोका वाढतो. एलडीएल कॉलेस्ट्रॉलचा स्तर १०० मिलीग्राम प्रति डेसीलिटर पेक्षा कमी असायला पाहिजे. तर एचडीएल कॉलेस्ट्रॉलचा स्तर ४० मिलीग्राम प्रति डेसीलिटर पेक्षा कमी झाल्यास हार्ट अटॅक येण्याची शक्यता जास्त वाढते.

**नियंत्रण कसे ?**

वजन नियंत्रण, व्यसने वेळीच आवरा ताण तणाव आटोक्यात शरीराला व्यायाम हवाच

# उन्हाळी भुईमुगाची लागवड करताय ? कोणत्या जाती निवडाल ?

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यात उन्हाळी भूईमुग लागवड क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. परंतू उत्पादकता मात्र कमी आहे. त्यामुळे विद्यापीठाद्वारे शिफारशीत लागवड तंत्रज्ञानाचा अवलंब करून उन्हाळी हंगामात भूईमुग पिकापासून अधिक उत्पादन घेण्यास बराच वाव आहे.म्हणुन यावर्षी शेतकरी बंधूनी आपल्या कडील उपलब्ध संसाधने व तंत्रज्ञान यांची योग्य सांगड घालुन उत्पादन वाढीच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहीजे. याकरीता भूईमुगाच्या वाणांची निवड महत्वाची आहे.

सुधारीत जाती व बियाणे

- उन्हाळी भूईमुग मे महिन्या अखेर पर्यंत निघणे आवश्यक असते.

- कारण त्यानंतर खरीप हंगामाचे पीक पेरणीची वेळ येते.




- त्याकरीता ११० ते ११५ दिवसात परिपक्व होणाऱ्या उपट्या प्रकारातील जातीची निवड करावी.

- उन्हाळी हंगामाकरीता टीएजी ७३, टीएजी २४ आणि एसबी ११ या वाणापैकी एका वाणाची निवड करावी.

**टीएजी ७३**

- हा नवीन वाण विद्यापीठाने विकसित केलेला आहे.

- या वाणाची उत्पादन क्षमता टीएजी २४ या वाणा पेक्षा जास्त आहे.

- तसेच दाण्याचा उतारा सुध्दा जास्त आहे.

टीएजी ७३ किंवा टीएजी २४ हे वाण उन्हाळी हंगामाकरीता उत्कृष्ट असे वाण आहेत. हे दोन्ही वाण लवकर (उन्हाळी हंगामात ११० ते ११५ दिवसात) परिपक्व होणारे आहेत.

**बियाणे प्रमाण**

सर्वसाधारणपणे १०० ते १२५ किलो बियाणे प्रति हेक्टरी लागते, परंतु बियाण्याचे प्रमाण ठरवितांना पेरणीकरीता निवडलेला वाण, हेक्टरी झाडांची संख्या (सरासरी ३.३३ लाख), बियाण्यातील १०० दाण्यांचे वजन, उपलब्ध बियाण्याची उगवणशक्ती याचा सामाईक विचार करावा. शक्यतोवर खरीप हंगामातील बियाणे उन्हाळी हंगामात पेरणी करीता वापरावे.




**बियाणे आणि महत्वाच्या बाबी**

- शेंगा पेरणीपूर्वी खूप अगोदर फोडू नये.

- चांगले दाणे निवडून पेरणी करावी.

- चांगल्या वाणाच्या बियाण्याचे गुणन स्वत:च करावे व स्वत:चे बियाणे स्वत:च निर्माण करावे.




# अमरावतीतील १२४० कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती :** फोटो घरकुलजिल्ह्यातील १२४० कुटुंबांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या १५ वर्षांपासून आवास योजनेच्या लाभापासून वंचित असलेल्या कुटुंबांना आता स्वत:चे हट्रकाचे घर मिळणार आहे. शासनाने त्यांच्या ताब्यातील अतिक्रमित जागा नियमानुकूल करण्याचा निर्णय घेत राज्य शासनाने दिलासा दिला आहे.



या कुटुंबापैकी सर्वाधिक ४८६ अतिक्रमण ग्रामपंचायतींच्या जागेवर होती. १९५ घरे गावठाण जमिनीवर तर ३२ घरे महसूल विभागाच्या जागेवर होती. ४१ प्रकरणांमध्ये नातेवाईकांच्या जागेवरील अतिक्रमणाचा प्रश्न होता. ४४ कुटुंबे पुनर्वसित जागेवर राहत होती. वन विभागाच्या जागेवर २४ आणि बुडीत क्षेत्रात २४ कुटुंबे वास्तव्यास होती. तसेच ३० प्रकरणांमध्ये जागा वादग्रस्त होती.

या सर्व कुटुंबांना आता प्रधानमंत्री आंवास योजना, शबरी आवास योजना, रमाई घरकुल योजना, पारधी आवास योजना किवा यशवंतराव चव्हाण आवास योजनेंतर्गत लाभ मिळणार आहे. जिल्हा ग्रामीणविकासयंत्रणेमार्फत (डीआरडीए) यायोजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजनांमधून स्वत:ची जागा नसलेल्या नागरिकांना नवीन घरकुलासाठी त मोडक्या-तोडक्या घरात राहणा-यांना पक्के घर बांधण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते.या निर्णयामुळे आता या कुटुंबांचे राहणीमान सुधारणार असून, त्यांना कर्ज घेणे आणि इतर आर्थिक व्यवहार करणेही सोपे होणार आहे. दीर्घकाळ चाललेल्या संघर्षाला यश मिळाल्याने या कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# काळी पिवळी मीटर टॅक्सी व ऑटो रिक्षा भाडे दरात वाढ करण्यास मान्यता

## भाडेदर १ फेब्रुवारी २०२५ पासून लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ मुंबई** मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि. २६ सप्टेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत काळी पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) भाडेदर सुधारणा करण्यात आली होती. त्यानंतर वाहनाची सरासरी किंमत, ग्राहक निर्देशांक, वाहन कर्जाचा व्याजदर आदी मध्ये वाढ झाल्यामुळे प्राधिकरणाने काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षांचे भाडेदरवाढ करण्यास राज्य परिवहन प्रकरणाच्या २३ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.भाडेदर सुधारणा मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील सर्व काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) यांना लागू राहील. भाडेदर सुधारणा १ फेब्रुवारी २०२५ पासून लागू होईल.जे टॅक्सी व ऑटोरिक्षा परवानाधारक सुधारीत भाडेदरानुसार भाडेमिटरचे रिक्लीब्रेशन करून घेतील. त्या ऑटोरिक्षा, टॅक्सीना ही भाडेवाढ लागू होईल. भाडेमिटरचे रिक्लीब्रेशन दिनांक १ फेब्रुवारी २०२५ पासून दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत करून घेणे आवश्यक राहील. (भाडेमिटरचे रिक्लीब्रेशन होईपर्यंत सुधारीत अधिकृत टॅरिफ कार्ड दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंतच अनुज्ञेय राहील.) मोटार वाहन अधिनियमनुसार बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या (बेस्ट) १८५० बसेसचे ६ टप्पा प्रवासी वाहतूक परवान्याचे नुतनीकरण करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.



मुंबई महानगर क्षेत्र प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये प्रवाशांच्या सोयीसाठी व लास्ट माईल कनेक्टिविटी अनुषंगाने नवीन ०२ काळी-पिवळी मीटर टॅक्सी स्टॅण्ड, ६८ ऑटोरिक्षा स्टॅण्ड व ०९ शेअर-ए ऑटोरिक्षा स्टँड उभारण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षांचे भाडेदर सूत्र विहित करण्याबाबत शासनाने खटुआ समितीची स्थापना केली होती. समितीने सादर केलेल्या अहवालास शासनाने ०९ मार्च २०२० रोजीच्या निर्णयाव्दारे मान्य केले आहे. त्यानुसार काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) भाडे निश्चितीच्या सुत्रानुसार व वाहनाची सरासरी किंमत, ग्राहक निर्देशांक, वाहन कर्जाचा व्याजदर आदी बाबी विचारात घेऊन भाड्याची परिगणना केली जाते. मोटार वाहन कायदा, १९८८ कलम ६८ अन्वये, राज्य शासनाकडून मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण समिती गठित करण्यात आलेली आहे.

**असे आहेत सुधारित दर :-**

काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) साठी पूर्वीचे प्रति कि.मी. १८.६६ रुपये वरून २०.६६ रुपये भाडेदर सुधारणा करण्यात आली आहे. आता काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) साठी किमान देय प्रति १.५ कि.मी. भाडे रूपये २८ रुपये वरून ३१ रुपये भाडेदर असणार आहे.-

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २९ जानेवारी २०२५ — शहर/ग्रामिण


# बाजार समितीला बदनाम करण्याचे षडयंत्र

## सभापती हरिश मोरे यांचे विरोधकांच्या आरोपाला प्रत्यूत्तर

### निवडणुकीचा वचपा काढण्यासाठी फक्त तक्रारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावती कृषी उपन्न बाजार समितीचे कामकाज व विकास या दोन्ही बाबींवर विरोधकांना आरोप प्रत्यारोप करण्यासाठी कुठेच जागा नाही. विकास कामांमध्ये अडथळे निर्माण करण्यासाठी तक्रारी करुन ते काम प्रलंबित ठेवण्याकरिता हा सर्व प्रकार सुरु आहे. फक्त शेतकऱ्याचा मुलगा सभापती झाला आणि निवडणुकीत त्यांचे संपूर्ण पॅनल पराजित झाल्यामुळे तो वचपा काढण्यासाठीच तक्रारी करुन अमरावती बाजार समितीला बदनाम करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप सभापती हरिश मोरे यांनी करित विरोधकांच्या आरोपाला प्रत्युत्तर दिले.

मोरे यांनी सांगितले की, निवडणुक झाल्यानंतर विरोधकांचे संपूर्ण पॅनल पराजित झाले. त्यांचे अंतर्गत दुखणे असल्यामुळे आता प्रत्येक विषयावर तक्रार करण्यात येत आहे. बाजार समितीमध्ये नवीन संचालक मंडळ निवडून आल्यानंतर विकास कामे करण्याकरिता सुरुवात केली. बाजार समि तीमध्ये अंधार असल्यामुळे विद्युतीकरणाचे काम करण्यात आले. प्रशासक काळातील अंधार दूर करण्यासाठी तसेच नवीन हंगामात वजनकाटे रात्री उशीरापर्यंत चालतात. परिणामतः शेतकऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागतो म्हणून संचालक मंडळाने डीडीआरकडे परवानगी घेऊन निविदा मागितल्या.१० लाखांच्या आतील कामे ऑनलाइन करण्याची गरज नसते, तरीही त्या कामांची तक्रार करण्यात आली. कामांची गंभीरता लक्षात घेऊन ते काम नियमामध्ये राहून लवकर करण्याचा प्रयत्न केल्यानंतरही तक्रारी करण्यात आल्या. म्हणजेच फक्त विकास होऊ न देणे व संचालक मंडळाला तक्रारीमध्ये व्यग्र ठेवणे हे एकमात्र षडयंत्र आहे, असे ही ते म्हणाले. शेतकऱ्यांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था नव्हती, त्यामुळे बाजार समितीमध्ये ठिकठिकाणी बॉटर कुलर लावण्यात आले. संपूर्ण बाजार समितीचे कामकाज कॅमेऱ्यामध्ये करण्यात येते. भंगाराचा हर्रास सुध्दा व्हीडीओ रेकॉर्डींगमध्ये करण्यात आला. विशेष म्हणजे त्या प्रक्रियेला खुद्द जिल्हा उपनिबंधक उपस्थित होते, तरीसुध्दा तक्रार करण्यात आली. व्हिडीओ रेकॉर्डींगमध्ये संपूर्ण मातेरा विकण्यात आला त्यातही तक्रार झाली. बाजार समितीमध्ये ३-४ कोटींची विकास कामे करण्यात आली.

त्याचीही तक्रार करण्यात आली. म्हणजेच बाजार समितीचे कोणतेही कामे करा तक्रार ही होणारच, मग संचालक मंडळाने विकास करायचाच नाही का? निवडणुकीचा वचपा काढण्यासाठी तक्रारी करुन विकास कामांमध्ये अडथळे आणण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामध्ये बाजार समिती बदनाम होत आहे. बाजार समिती संचालक मंडळ व प्रशासक फक्त शेतकरी व त्यांच्याकरिता योजना व त्यांना देण्यात येणारी सुविधा अधिकाधिक कशी देता येईल यावरच विचार करित आहे. अजूनही काही विकासात्मक कामे होणार आहे, मात्र त्यापूर्वी तक्रारी करुन संचालक मंडळाला मानसिक त्रास देणे सुरु आहे. मात्र संपूर्ण संचालक मंडळ तसे होऊ देणार नाही. बाजार समितीकरिता नेहमीच शेतकरी हा मोठा राहणार असून त्यांना सुविधा देतांना जे कुणी अडथळे आणण्याचा प्रयत्न करित असेल तर त्याला उत्तर देण्यास मंडळ कटिबध्द आहे. अशा किती तरी तक्रारी केल्या मात्र एकाही तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे त्यांनी आता शेतकऱ्यांसाठी मगरीचे अश्रू गाळणे सोडून द्यावे, असा टोलाही त्यांनी लगावला.

# एमआयडीसी असोसिएशनची निवडणूक बिनविरोध

## सर्व २१ जागांसाठी केवळ २१ उमेदवारी अर्ज

## दिनेश सिंग आणि बसंतवानी यांनी मागे घेतला अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावती एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या २१ सदस्यीय संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध पार पडली. निवडणूक रिंगणातील दिनेश सिंग आणि मोहन बसंतवानी यांनी अर्ज मागे घेतले. त्यानंतर २१ जागांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे केवळ २१ अर्ज शिल्लक राहिले असून यासह एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या सर्व सदस्यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले.

२ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या २१ सदस्यीय संचालक मंडळासाठी निवडणूक होणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. ज्यांची नामनिर्देशन प्रक्रिया सध्या निवडणूक निर्णय अधिकारी अ‍ॅड. बाळासाहेब देशपांडे यांच्या देखरेखीखाली कार्यरत होती.

२१ सदस्यीय संचालक मंडळासाठी एकूण २३ नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात आली होती. मात्र उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दिनेश सिंग आणि मोहन बसंतवाणी यांनी उमेदवारी मागे घेतल्याने उद्योजकांची एकजूट दिसून आली आणि २१ जागांसाठी केवळ २१ दावेदार निवडणूक रिंगणात राहिले. त्यामुळे ही निवडणूक पूर्णपणे बिनविरोध झाली.ज्यावर एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनचे मावळते अध्यक्ष किरण पातुरकर यांनी आनंद व्यक्त करून हा औद्योगिक एकतेचा विजय असल्याचे सांगितले.

### विजयी उमेदवार

अशोक अग्रवाल (गोयल), दीपक अग्रवाल, दिलीप अग्रवाल (डीके), मुकेश अग्रवाल, नंदकिशोर अग्रवाल, राजेंद्र अग्रवाल, राजेश अग्रवाल, पुरुषोत्तम बजाज, गजानन बारोटकर, महेश बत्रा, कमलेश डागा, सचिन जाधव, बंटी जगमलानी, ए. आर. माधोगढिया, विजय मोहता, किरण पातुरकर, अजय पवार, परेश राजा, प्रकाश राठी, आशिष सावजी, हर्षवर्धन वर्मा.




# बीएनएस कायद्यांमध्ये बदल कमी, पण भविष्यात मोठा फायदा

## तांत्रिक पुराव्यामुळे गुन्ह्यांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण वाढेल -जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. परीक्षित गणोरकर यांचे मत

### पोलिस आयुक्तालयात पत्रकारांसाठी बीएनएसबाबत कार्यशाळा

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२९अमरावती**

आयपीसी रद्द करून बीएनएस प्रणाली लागू झाल्यानंतर बऱ्याच याप्रमाणात सर्व घटकांमध्ये गोंधळ निर्माण झाला. बीएनएस प्रणालीमध्ये सर्वच कलमांमध्ये न बदल न करता गंभीर गुन्ह्यातील कलमांमध्ये गरजेनुसार बदल करण्यात आला. तांत्रिक पुराव्यांना - मुभा दिल्याने भविष्यात न्याया लयात गुन्ह्यांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण वाढेल, असा विश्वास जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड, परिक्षित गणोरकर यांनी व्यक्त केला.

आज पोलिस आयुक्त कार्यालयात पत्रकारांसाठी बीएनएस कार्यप्रणालीबाबत कार्य शाळा आयोजित करण्यात आली होती. प्रमुख वक्ता म्हणून अ‍ॅड. परिक्षित गणोरकरांनी पत्रकारांना नविन कायदे प्रणालीचे धडे दिले.

बीएनएस कार्यप्रणालीबाबत पुढे माहिती देतांना अ‍ॅड. गणोरकर म्हणाले की, इंग्रजकाळापासून सुरू असलेली आयपीसी शब्द म्हणजे इंडियन पिनल कोड हे पोलिस, पत्रकार, जनतेसह सर्वांच्याच तोंडात बसला होता. केंद्र शासनाने सन २०१३ पासून बीएनएस म्हणजे भारतीय न्याय संहिता लागू केली. बीएनएस प्रणाली लागू करण्यापूर्वी पोलिससह विविध संबधीत विभागांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यानुसार समाजाचा आरसा असलेल्या पत्रकारांना देखील बीएनएस प्रणाली ज्ञात असणे आवश्यक आहे. वास्तविक पाहता बीएनएस प्रणालीमध्ये आयपीसीच्या सर्वच कलमांमध्ये बदल करण्यात आले नाही. गंभीर गुन्ह्याची जी कलमे आहेत, जशी हत्या, हत्येचा प्रयत्न, दरोडा, घरफोडी, बलात्कार, विनयभंग, पोस्को, सायबर क्राईल, फसवणूक, घोटाळ्यासह बऱ्याच गंभीर गुन्ह्यांच्या कलमांमध्ये गरजेनुसार बदल करण्यात आला. तो बदल म्हणजे काही गुन्ह्यात शिक्षेचे प्रमाण वाढविण्यात आले.



आर्थिक दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली.

विशेष म्हणजे पूर्वी तांत्रिक पुरावे न्यायालयात सादर करणे आणि सिध्द करणे फार कठीण होते. तांत्रिक पुराव्यात छेडछाड करण्यात आली नसल्याचे प्रमाणपत्र नागपुर फॉरेन्सीक लॅबमधून आणावे लागत होते. परंतु, आता बीएनएस प्रणालीमध्ये तांत्रिक पुराव्यांना मोठया प्रमाणात मुभा देण्यात आली असून फॉरेन्सीक लॅब

अमरावती शहरातच असल्याने पोलिसांना तपासामध्ये भरपूर फायदा होणार असल्याचे अ‍ॅड. परिक्षित गणोरकर म्हणाले. विशेष म्हणजे तांत्रिक पुराव्यांना कशा प्रकारे मुभा देण्यात आली हे अ‍ॅड. गणोरकर यांनी उदाहरणासह स्पष्ट केले. एखाद्या मुलाने मुलीला अश्लिल मॅसेज, व्हिडीओ पाठविले आणि गुन्हे दाखल झाल्याचे कळताच ते त्याने मोबाइलमधून डिलिट केले किंवा मोबाइल फेकून दिला, मोबाइल जप्त होऊ शकला नाही. परंतु, मुलीच्या मोबाइल रिसिव्ह झालेले मॅसेज देखील न्यायालयात तांत्रिक पुरावा म्हणून सादर करता येतील, असे अ‍ॅड. गणोरकर म्हणाले. आजच्या अ‍ॅन्ड्राईडच्या युगातही बहुतांश वर्ग वर्तमानपत्र वाचणारा आहे. पत्रकारांमार्फत सर्व स्तरातील लोकांना बीएनएस कायद्याच्या कार्यप्रणलीणीची माहिती होण्या करिता पोलिस आयुक्तांनी आज २८ जानेवारीजानेवारी रोजी पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित केल्यामुळे अ‍ॅड. परिक्षित गणोरकर यांनी सीपींचे आभार मानले.

यावेळी मंचावर अ‍ॅड. परिक्षित गणोरकर यांच्यासह डीसीपी कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे, महिला सेलच्या प्रमुख पीआय दिप्ती ब्राम्हणे उपस्थित होते. गुन्हेशाखेचे पोलिस निरिक्षक गोरखनाथ जाधव यांनी कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन केले.

# अवघ्या काही तासांतच २७० जणांचे रक्तदान

## स्व. भैय्यासाहेब ठाकूर यांच्या जयंतीदिनी रक्तदानाचा महाकुंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

सर्वासामान्य, गोरगरीब, शेतकरी, शेतमजूरांसाठी आपले जीवन वेचणारे माजी आमदार, लोकनेते स्व.भैय्यासाहेब ठाकूर यांची जयंती तसेच स्व. कुमारसाहेब ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी (ता.२८) आयोजित रक्तदान शिबिरात अवघ्या काही तासांतच २७० पेक्षा अधिक युनिट रक्ताचे संकलन झाले.विशेष म्हणजे भैय्यासाहेबांच्या कन्या, महाराष्ट्राच्या माजी मंत्री अ‍ॅड. यशोमती ठाकूर तसेच आकांक्षा ठाकूर यांनी सुद्धा रक्तदान करित स्व. भैय्यासाहेबांना आदरांजली वाहिली. लोकनेते स्व. भैय्यासाहेब ठाकूर यांच्या जयंतीदिनाचे औचत्य साधून श्री. रामचंद्र युवक कल्याण संस्था, मोझरी तसेच अ‍ॅड. यशोमती ठाकूर मित्रमंडळाच्या वतीने भैय्यासाहेब ठाकूर यांचे समाधीस्थळ शिंदी पांडी पंचधारा मोझरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे सकाळी ९ ला रक्तदान शिबिर सुरू झाल्यानंतर काही तासांतच २७० युवकांनी रक्तदान करित भैय्यासाहेबांना आदरांजली दिली. शहर तसेच जिल्ह्यातील रक्तपेढ्यांमध्ये रक्ताची गरज निर्माण झाली असून रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने अ‍ॅड. यशोमती ठाकूर यांच्या सूचनेनुसार पदाधिकाऱ्यांनी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. खासदार बळवंत वानखडे, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश मोरे, जिल्हापरिषदेचे माजी सभापती बाळासाहेब हिंगणीकर, माजी सभापती जयंतराव देशमुख, श्रीकांत बोंडे, रमेश काळे, सतीश पारधी, अमित गावंडे, वैभव वानखडे, पंकज देशमुख, प्रद्युम्न पाटीलसह अनेक मान्यवरांनी रक्तदान शिबिराला भेट देत रक्तदात्यांचा उत्साह वाढविला तसेच लोकनेते भैय्यासाहेब ठाकूर यांना आदरांजली वाहिली. या रक्तदानाच्या या महाकुंभात कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक सहभागी झाले होते.

### रक्तदान हेच जीवनदान

वेळेवर रक्त मिळाल्याने अनेक रुणांचे प्राण वाचविले जावू शकते. रक्ताची अडचण लक्षात घेता कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी अधिकाधिक संख्येने रक्तदान करण्याची गरज यावेळी माजी मंत्री अ‍ॅड. यशोमतीताई ठाकूर यांनी व्यक्त केली. त्याला कार्यकर्त्यांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला.



# शिक्षक बँक,सहकारी बँकेतील पाच सदस्यांवर टांगती तलवार



## सहकार क्षेत्रात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती-**

जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि शिक्षक सहकारी बँकेत उच्च न्यायालयाच्या एका निकालानंतर चांगलीच खळबळ उडाली आहे.

शिक्षक सहकारी बँकेतील पाच विरोधी संचालकांवरील अविश्वासाच्या प्रस्तावाला न्यायालयाने वैध ठरविले तसेच आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतसुद्धा अडकलेल्या अविश्वासाचे भूत पुन्हा बाटलीबाहेर येणार असल्याने सहकार विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे. येणाऱ्या काही दिवसांत त्याचे चित्र दिसण्यास सुरवात होणार असून उच्च न्यायालयाच्या या निकालावर स्थगनादेश मिळविण्यासाठी दोन्ही बँकांतील विरोधी लोकांनी आता सर्वोच्च न्यायालयात जाण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

शिक्षकांच्या हक्काची बँक म्हणून परिचीत जि. प. शिक्षक सहकारी बँकेत सत्ताधारी १४ संचालकांनी पाच विरोधी संचालकांवर ४ जानेवारी २०२४ रोजी अविश्वास ठराव आणून तो पारित केला. बँकेतील विरोधी बाकावरील संचालक असलेले प्रभाकर झोड, मंगेश खेरडे, मनोज चौरपगार, गौरव काळे तसेच संजय नागे या पाच संचालकांचे संचालकपद खारिज करण्यात आले होते. त्याविरोधात पाचही संचालकांनी कायदेशीर बाबी तपासून पाहण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.उच्च न्यायालयाकडून अविश्वास ठरावाला वैधता देण्यात आल्याचे शिक्षक बँकेत आता विरोधी पक्षच उरलेला नाही.विशेष म्हणजे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि शिक्षक बँकेतील दोन्ही याचिका टॅग करून न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत बबलू देशमुख, प्रा. वीरेंद्र जगताप व कॉंग्रेस समर्थित संचालक मंडळाकडून विद्यमान अध्यक्ष बच्चू कडू आणि उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांच्यावर अविश्वास प्रस्ताव आणण्याची परवानगी विभागीय सहनिबंधकांकडे मागण्यात आली होती. मात्र त्यांनी ती नाकारल्याने बँकेचे संचालक प्रा. वीरेंद्र जगताप व अन्य १४ संचालकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून अविश्वास प्रस्तावाची परवानगी मागितली होती.उच्च न्यायालयाकडून टॅग असलेल्या दोन्ही याचिका निकाली काढण्यात आल्या असून शिक्षक बँकेतील अविश्वासाला मान्यता देणारा निकाल न्यायालयाकडून देण्यात आल्याने आता जिल्हा बँकेतसुद्धा अविश्वास ठरावास परवानगी द्यावी लागणार आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत येत्या काही दिवसांत वादळ येण्याची शक्यता आहे.विरोधात निकाल लागल्याने दोन्ही बँकांमधील काही संचालक आता सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची तयारी करीत आहेत. यासंदर्भात शिक्षक बँकेचे अध्यक्ष गोकुलदास राऊत बाहेरगावी असल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.



> यासंदर्भात न्यायालयीन निर्णयाचा आम्ही अभ्यास करणार असून पुढे सर्वोच्च न्यायालयात दाद मागू, बहूमत तसेच आमच्याकडेच असल्याने अविश्वास आला तरी आम्ही त्याला यशस्वीपणे सामोरे जाऊ.
>
> **- अभिजित ढेपे, उपाध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती बँक.**

> न्यायालयाने दिलेल्या निर्णयातील कायदेशीर बाबी तपासून या निकालाला सर्वोच्च न्यायालयात चॅलेंज करण्याची आमची तयारी आहे. सर्व संचालकांशी चर्चा करून याबाबत निर्णय घेणार.**- मंगेश खेरडे,** माजी संचालक, शिक्षक बँक.-

## शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त

# नांदगावात १७५ रक्तदात्यांनी केले विक्रमी रक्तदान

### शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांचे सातत्याने सात वर्षांपासून यशस्वी आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नांदगाव खंडेश्वर**
शिवसेनाप्रमुख हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी नांदगाव शहरात रक्तदान शिबिराचे आयोजन करून १७५ रक्तदात्यांनी विक्रमी नांदगाव तालुक्यात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक रक्तदान करून सामाजिक उपक्रमांनी जयंती साजरी केली शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून आरोग्य शिबीर व मागील सात वर्षांपासून सातत्याने नांदगाव शहरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते कोरोना काळात सुद्धा विक्रमी १५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले होते दर वर्षी रक्तदान शिबीराचे आयोजन युवा सेनेचे माजी जिल्हाप्रमुख प्रकाश मारोटकर करीत असतात यावर्षी सुद्धा तब्बल १७५ बॉटल रक्तदात्यांनी रक्तदान केले यामध्ये महिलांचा सुद्धा समावेश होता व तरुण युवकांनी रक्तदान केले यावेळी माजी खासदार अनंत गुढे जिल्हाप्रमुख मनोज कडू जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अभिजित ढेपे बाळासाहेब भागवत यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उदघाटन व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले यावेळी बाळासाहेब राणे प्रमोद कोहळे रेखाताई नागोलकर निलेश इखार शरद बोदडे डॉ प्रमोद कठाळे प्रमोद ठाकरे विलास सावदे विलास चोपडे अमोल धवस मधुकर कोठाळे श्रीकृष्ण सोळंके अमोल दांडगे मनदेव चव्हाण विजय अजबले अरुण बेलसरे निलेश इखार वासुदेव लोखंडे रमाकांत मुरादे इत्यादी उपस्थित होते या रक्तदान शिबीराच्या यशस्वीतेसाठी रवी ठाकूर गुणवंत चांदूरकर अक्षय राणे अक्षय तुपट सुमित लोमटे शुभम रावेकर पवन शिरभाते अक्षय हिवराळे सागर भामुद्रे सुनील गुरमुळे चेतन डकरे अनिकेत गटूले भुमेश्वर गोरे पवन डोफे श्याम मुळे प्रफुल ठाकरे सुमित चौधरी शेषराव शिंदे आशिष हटवार अंकुश कुर्जेकर स्नेहल प्रभाते नितीन दुधे चेतन केळकर मनीष भोसले पवन पुसदकर अक्षय काकडे सूरज लोमटे आकाश लाड भारत तिरमारे आशिष भाकरे भावेश भांबुरकर अनिल बुदले आकाश रुमने मंगेश सुरोसे प्रमोद आढवू इत्यादींनी परिश्रम घेतलेज्या प्रमाणे देशाची सुरक्षा सीमेवर जवान करतात धान्य पिकवून देशातील प्रत्येकाला जगवण्याचं काम शेतकरी करतात त्याचं प्रमाणे रक्तदान करून रुग्णांची सेवा तरुणांनी करावी करावी असे आवाहन प्रकाश मारोटकर यांनी केले होते या आवाहनाला प्रतिसाद देत तरुणांनी नांदगाव तालुक्याच्या इतिहासात विक्रमी रक्तदान केले. या रक्तदान शिबीरात महिलांनी लक्षणीय रक्तदान केले तर पंचायत समिती कर्मचारी पोलीस स्टेशनचे कर्मचारी वीज वितरण कंपनीचे कर्मचारी ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी तलाठी पोस्ट कर्मचारी पत्रकार तरुण युवक मंडळांनी या रक्तदान शिबिरात रक्तदान केले

---

# धामणगावात ४१ हजार ८४६ क्विं. सोयाबीन खरेदी

### शेतकऱ्यांना २० कोटी ४७ लाखाची रक्कम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९धामणगाव रेल्वे,**
सोयाबीनया हंगामात हमीभाव योजना अंतर्गत तालुक्यातील दत्तापुर (धामणगांव) खरेदी विक्री समिती तर्फे मार्कट यार्ड वर सुरु असलेल्या सोयाबीन खरेदी केंद्रावर ४१ हजार ८४६ क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली आहे. त्याची रक्कम जवळपास २० कोटी ४७ लाखाच्या घरात आहे. दरम्यान ३१ जानेवारी २०२५ पर्यंत खरेदी चालू राहणार असल्याची माहिती आहे.

नाफेड व एनसीसीएफ अंतर्गत राज्यस्तरीय नोडल एजन्सीच्या माध्यमातून सोयाबीन खरेदी सुरू आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची १ ऑक्टोबर २०२४ पासून नोंदणी सुरू केली होती. त्यात तालुक्यातील ३ हजार ६०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी २ हजार ७०० शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे मोजमाप २८ जानेवारी पर्यंत झाली आहे. तसेच २२ जानेवारी पर्यंत खरेदी केलेल्या सोयाबीनचे चुकारे करण्यात आल्याची माहिती दत्तापुर (धामणगाव) खरेदी विक्री समितीचे व्यवस्थापक मारोती बोकडे यांनी दिली आहे.-

---

# तू जादुटोणा करते, माझी तीन मुले मारुन टाकली

## चिखलदरा ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** जादुटोणा करून माझ्या तीन मुलांना मारून टाकले, असे म्हणत महिलेला शिवागाळ करीत तिच्या अंगातील ब्लॉऊज फाडून विनयभंग केल्याची घटना २६ जानेवारीला चिखलदरा ठाण्यांतर्गत येणाऱ्या बोरी गावात घडली. याप्रकरणी पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून शिवा सुरेश दारसिंबे (वय २३ रा. बोरी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मेळघाटात अद्यापही अंधश्रद्धेवर विश्वास ठेवतात. कोणी आजारी असेल किंवा लहान बाळ आजारी असेल तसेच गर्भवती महिलांवर भुमका बाबाच्या सांगण्यावरून घरीच उपचार केले जातात. रेहट्याखेडा गावात एका वृद्ध महिलेवर जादुटोणा करण्याचा संशय घेऊन गावातील नागरिकांनी तिची

गावात धिंड काढली होती. त्यानंतर अशाच प्रकारची घटना चिखलदरा ठाण्यांतर्गत येणाऱ्या बोरी गावात उघडकीस आली. २६ जानेवारीला पीडित महिला सुनेसह घरी असताना शिवा दारसिंबे हा महिलेच्या घरासमोर आला आणि महिलेला शिवीगाळ करीत तू जादुटोणा करते, तू माझी तीन मुले मारून टाकली असे म्हणत तीला शिवीगाळ करीत होता. त्यामुळे महिला घरातून बाहेर आली तेव्हा शिवा महिलेजवळ गेला आणि तिचे ब्लॉऊज फाडून तिचा विनयभंग केला. महिला घाबरली आणि २७जानेवारीला सकाळीच ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी विनयभंग व महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून शिवा दारसिबेला अटक केली.

---


# प्रयागराज येथील संगमावर डॉ. सुनील देशमुख यांचे स्नान

### महाकुंभात मानव जातीच्या सुख, समृद्धी, कल्याणाकरिता मनोभावे प्रार्थना









**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** हिंदू धर्मातील भक्ती आणि भव्यतेचा अनोखा संगम म्हणजे प्रयागराज येथील कुंभमेळा. गंगा, यमुना आणि पौराणिक णिक सरस्वती नद्यांच्या संगमावर या भव्य दिव्य आयोजनाचे अनुभूती प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय होणे शक्य नाही. ही अनुभूती अमरावतीचे माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी प्रयागराज येथे अनुभवली.

तब्बल १४४ वर्षांनंतर होणाऱ्या दुर्मीळ ग्रहस्थितीमुळे या वर्षीच्या महा कुंभमेळ्याला आगळे महत्त्व बाप्त झाले आहे. जगातील सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्याचे प्रतीक नसलेल्या महाकुंभ २०२५ साठी आतापर्यंत सात कोटी भाविकांनी भेट दिल्याचे माहिती आहे. माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी स्नेहीजनांसह या अपूर्व पर्वणीचा लाभ घेतला. प्रयागराज येथील संगमावर स्नान केले. आपल्या वैयक्तिक व समस्त मानव जातीच्या समृद्धी, सुख, समृ समाधान व कल्याणाकरिता त्यांनी मनोभावे प्रार्थना केली.

प्रयागराज ही नद्यांच्या तसेच संस्कृतींच्या संगमाची भूमी आहे, ज्याला कधी इलावर्त, कधी इलाबास असे म्हटले जात असे. हे इलावास या नावाचा अपभ्रंश होत नंतर ते इलाहवास झाले आणि नंतर अलाहाबादमध्ये झाले आणि त्याला अलाहाबाद असेही म्हटले जाऊ लागले. 'प्र' या शब्दाचा अर्थ 'प्रथम' (पहिला) आणि 'याग' म्हणजे 'यज्ञ' असा होतो. भगवान ब्रह्मदेवाने अक्षय वट जवळ विश्वातील पहिला यज्ञ केला होता आणि त्या ठिकाणाचे नाव प्रयाग पडले. कालांतराने संपूर्ण परिसर प्रयागराज म्हणून ओळखला जाऊ लागला. अशी आख्यायिका प्रचलित आहे. कुंभमेळ्याच्या प्रवासादरम्यान अयोध्या येथे प्रभू श्रीरामाचे दर्शन घेण्याचे भाग्यसुद्धा लाभले. अशा तीर्थयात्रा आपल्या जीवनाचे भावविश्व समृद्ध करीत असते. प्रयागराज कुंभ येथील त्रिवेणी संगमावरील कुंभ स्नान ही अभूतपूर्व पर्वणी प्रत्येकाने अनुभवावी व आपले भावविश्व समृद्ध करावे, असे आवाहन डॉ. सुनील देशमुख यांनी केले आहे.

---

# घटनेला २८ दिवस होऊनही कारवाई नाही

### रेयट्याखेडात जादुटोण्याच्या संशयावरून वृध्देची धिंड काढल्याचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**
रेयद्याखेडात ३० डिसेंबर रोजी जादुटोण्याचा संशयावरून वृध्द महिलेला चटके देऊन तिची धिंड काढण्यात आल्याची घटना उघड झाल्यानंतर संपूर्ण राज्यात हडकंप माजला होता. विशेष म्हणजे चिखलदरा पोलिसांनी गुन्हा बर्क केल्यामुळे खुद्द एसीपींनी त्या गुन्ह्यात कलम वाढविले. अंजनगावच्या एसडीपीओकडे तपास दिला. परंतु, घटनेला २८ दिवस झाले असताना देखील अद्यापही चिखलदराचे ठाणेदार, गुन्हा दाखल करणारे टाऊन इंचार्ज व तपास पेंडीग ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई केली नाही. पोलिस प्रशासन त्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप विविध आदिवासी संघटनांनी करत २९ जानेवारीला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. जादुटोण्याचा संशया वरून रेयट्याखेडा गावातील ७७वर्षीय वृध्द महिलेला भल्या पहाटे ४ वाजता मारहाण करून तिलाजळत्या लाकडाचे चटके दिले, तोंडाला काळीमा फासून गावात तिची धिंड काढली होती. या प्रकरणी एसपी विशाल आनंद यांनी अंजनगावचे एसडीपीओ डॉ. सिध्देश्वर धुमाळ यांच्याकडे गुन्हयाचा तपास दिला. चिखलदरा पोलिस ठाण्यातील टाऊन इंचार्ज दिपक सोनाळेकर यांनी पोलिस पाटील बाबु जामुनकरसोबत मिळून वृध्देच्या तक्रारीतून धिंड काढणे, खांबाला बांधून ठेवण्याचा मुद्दा का वगळला, नरबळी, अमानुष अनिष्ट, अघोरी प्रथा, जादुटोणा अधिनिअमचे कलम ३ नुसार गुन्हा दाखल न करता नाममात्र दुखापतीचे गुन्हे दाखल केले. हे सर्व जगजाहीर व उघड असताना देखील आज घटनेला २८ दिवस झाले असताना संबंधितांवर कारवाई न केल्याने पोलिस प्रशासन दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोपी विविध आदिवासीसंघटनांनी केला आहे.

> **सत्ताधारी आमदाराच्या पत्राला केराची टोपली**
>
> रेयटाखेड्यात वृध्देची धिंड काढल्याचे प्रकरण समजताच मेळघाटचे भाजपचे आमदार केवलराम काळे यांनी स्वतः या गंभीर प्रकरणाबाबत चिखलदऱ्याच्या ठाणेदारांना फोनवर माहिती दिली. तरी देखील चिखलदऱ्याच्या ठाणेदाराने योग्य कारवाई केली नाही. एसपीच्या आदेशावरून गंभीर कलमान्वे गुन्हे दाखल झाल्यानंतर आ. काळेंनी याबाबत एसीपी विशाल आनंद यांना पत्र देऊन दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले. परंतु, एसीपींनी सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या पत्राला देखील केराची टोपली दाखविली.

---

# संवाद ज्येष्ठ महिला मंडळाची स्थापना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** विद्युत नगर विमवी रोड अमरावती येथे नुकतीच महिलांची संवाद ज्येष्ठ भगिनी मंडळाची स्थापना उत्साहात करण्यात आली.या प्रसंगी उद्घाटक म्हणून पश्चिम विदर्भ प्रांताचे व गाडगे बाबा अमरावती चे अध्यक्ष श्री पुरुषोत्तम गावंडे ,प्रमुख अतिथी म्हणून हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळ च्या अध्यक्ष व अमरावती महानगर ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या समन्वय समिती च्या अध्यक्ष, डॉ शोभा गायकवाड.अमरावती जिल्हा ज्येष्ठ नागरिक समितीच्या समन्वय समिती चे अध्यक्ष श्री दामोदर पवार,गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे पदाधिकारी श्री अनिल काळे उपस्थित होते.पी.ती.गावंडे यांनी यावेळी शासनाच्या ज्येष्ठ नागरिक धोरणाची व विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.सदस्य वाढविणे आदीबाबत मार्गदर्शन करून संवाद ज्येष्ठ महिला मंडळ सर्व स्तरातील महिलांच्या उन्नतीसाठी कार्य करेल अशी आशा व्यक्त केली. ज्येष्ठांची शिखर संघटना फेस्कॉम व ज्येष्ठांच्या महत्त्वाच्या कायद्या बद्दल माहिती दिली. सावित्री बाईंच्याप्रतीमा पूजनाने व दीप प्रज्वालनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.संवादच्या अध्यक्ष आशा ताई निचत व उपाध्यक्ष माया ताई बोंडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.प्रास्ताविक कार्याध्यक्ष सविता ताई तलवारे यांनी प्रास्ताविक केले.सचिव अंजली ताई कुलकर्णी यांनी आभाप्रदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशसीतेसाठी सुमन सांगोले,सुनीता आवारे,उषा उंबरकर,सिंधू वासनिक,शिला वानखेडे,विजया गावंडे,सविता वावरे,प्रमिला टाके,कल्पना लेवरकर,हेमलता जोजदे,कल्पना तायवाडे,श्वेता,तल तांबडे,उषा अकोटकर,हर्षा वानखेडे,यांनी प्रयत्न केले.

---

# माजी राष्ट्रपती प्रतिभा देवीसिंह पाटील कला दालनाचे उद्घाटन

### प्रतिभा कला दालन तरुणांना सदैव प्रेरणा देत राहील- जिल्हाधिकारी सौरभ कटियार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती –**
भारताच्या प्रथम महिला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील कला दालनाचे उदघाटन विद्याभारती महाविद्यालयात प्रजासत्ताकदिनाच्या पर्वावर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते झाले. प्रतिभा कला दालन तरुणांना सदैव प्रेरणा देत राहिल, असे प्रतिपादन याप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार रावसाहेब शेखावत तसेच विद्याभारती जेम्सच्या अध्यक्ष मंजरीताई शेखावत उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना मानवंदना देऊन त्यांचे स्वागत केले तसेच गॅलरीचे रिबीन कापून व दीपप्रज्वलन करून कला दालनाचे उद्घाटन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर यांनी केले.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना रावसाहेब शेखावत म्हणाले, हे कला दालन अतिशय परिश्रमाने निर्माण झाले आहे हे अभ्यासकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणा देणारे ठरेल. या निमित्ताने ताई साहेबांच्या गेल्या पन्नास वर्षाच्या राजकीय व सामाजिक, सांस्कृतीक विचारांच्या वारसाची जपणूक होईल. याप्रसंगी अमरावती शहरातील विविध क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.यावेळी माजी मंत्री सुरेंद्र भुयार, शरद तसरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारीणी सदस्या सुभाषराव बनसोड, ब्रिजलाल बियाणी शिक्षण संस्थेचे अध्याक्ष ओम प्रकाश लढढा, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, अमरावती शहरातील सुप्रसिद्ध कान नाक घसा तज्ञ डॉ. बबन बेलसरे, दंतरोग तज्ञ डॉ. अडवाणी, डॉ. अरोरा, डॉ. हरवाणी, डॉ. सुनील रघुवंशी, डॉ. कांता रघुवंशी, विद्याभारती शैक्षणिक संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. मिथिलेशराठौर, सचिव डॉ.ए.डी. चव्हाण, कोषाध्यक्ष आर.एन. रोडे, विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे संदस्य, भंवरसिंह शेखावत, बबलू शेखावत, विजयसिंह शेखावत, ओमसिंह शेखावत, संस्थेतील माजी प्राचार्य डॉ. के. एन. पाटील, डॉ. एफ.सी.रघुवंशी, डॉ. पी. आर.राजपूत, तसेच फार्मसीचे प्राचार्य डॉ.ए.टी. पांडे, प्राचार्य डॉ. के.व्ही. शिरभाते, प्राचार्य जी. बी. तंवर, व सर्व विभाग प्रमुख या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित होते. या कला दालनाची सजावट वैखरी यावलीकर, डॉ. ठकसेन राजगुरे यांनी केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. ए. डी. चव्हाण, प्रा. मनिंदर मोंगा, डॉ. आर. एम.पाटील, प्रा. एच. के. सिसोदिया यांनी सहकार्य केले. हे दालन शाळा, महाविद्यालय, नोंदणीकृत सामाजिक संस्था व नागरिकांना विद्याभारती संस्थेची रितसर परवानगी घेऊन ठरलेल्या वेळेत बघता येईल, असे आवाहन संस्थेने केले आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पदव्युत्तर इंग्रजी विभागात सत्कार सोहळा व माजी विद्यार्थी मेळावा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर इंग्रजी विभागाद्वारे शनिवार दिनांक २५.१.२०२५ रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये पदव्युत्तर इंग्रजी विभागातील विद्यार्थी साकेत बिसांदरे, कु. अंजली सावलकर, कु. रीबा शेख़, कु. स्वाती कासार यांना यंदाची नेट-सेट परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान देऊन प्रतिष्ठित 'स्वामिनी पुरस्कार' च्या मानकरी ठरलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक च्या संपादिका शुभांगी जोशीयांना कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि विद्यापीठाचे प्र-कुलगुरू मा. डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

सत्कार सोहळ्याला उत्तर देत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ व विभागाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करीत आभार मानले. आपल्या संबोधनामध्ये विभागप्रमुख डॉ. संदीप जोशी यांनी विद्यार्थ्यांना विनम्रता आणि कृतज्ञभाव हे गुण अंगी जोपासून सकारात्मक दृष्टिकोणाने उत्तरोत्तर प्रगती साधून सतत विभाग तसेच विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घालावी, असे आवाहन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आपल्या विद्यार्थी जीवनाच्या स्मृतिंना उजाळा देत वेगवेगळे उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा. ज्योती पाटील यांनी आभारप्रदर्शन तर एम. ए भाग -१ चा विद्यार्थी श्री. ऋषिकेश दौतपुरे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन केले.

# विद्याभारतीचे डॉ. विजय मसंद जगातील टॉप ५ टक्के वैज्ञानिकांमध्ये; WHO कडून मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२९अमरावती**

अमरावतीतील विद्याभारती महाविद्यालयासाठी अभिमानास्पद क्षण आला आहे. येथील रसायनशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. विजय मसंद यांना स्कॉलर जीपीएस या प्रतिष्ठित संस्थेने जगातील अग्रगण्य ५ टक्के वैज्ञानिकांमध्ये स्थान दिले आहे.

डॉ. मसंद यांनी औषध रचना आणि शोध क्षेत्रात केलेल्या क्रांतिकारी संशोधनामुळे त्यांना हा मान मिळाला आहे. त्यांच्या नावावर तीन पेटंट्स आणि पाच प्रकाशित पुस्तके आहेत. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च प्रभाव असलेल्या जर्नल्समध्ये १५० पेक्षा अधिक संशोधन लेख प्रकाशित केले आहेत.



कोविड-१९ विषयावरील त्यांचे सात संशोधन लेख जागतिक आरोग्य संघटनेने (थकज) जागतिक मानक साहित्य म्हणून मान्यता दिली आहे. विशेष म्हणजे नवीन औषधांच्या शोधासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणाऱ्या जगातील टॉप १.१ टक्के वैज्ञानिकांमध्ये त्यांचा समावेश आहे.

डॉ. मसंद यांनी अमेरिका, जर्मनी, क्रोएशिया, सौदी अरेबिया, मोरोक्को, इटली आदी देशांतील वैज्ञानिकांसोबत संशोधन सहकार्य स्थापित केले आहे. केमिनफॉमटिक्स आणि औषध शोध क्षेत्रात त्यांच्या संशोधनामुळे महत्त्वपूर्ण प्रगती झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेल्या डॉ. मसंद यांनी आपल्या यशाचे श्रेय पालक, कुटुंब आणि गुरूंना दिले असून, महाविद्यालय व्यवस्थापनाच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्यांचे हे यश संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# सिद्धिविनायक मंदिरात शॉर्ट, स्कर्टला विरोध म्हणजे महिलांवर अन्याय, सदावर्तेंच्या मुलीची राष्ट्रीय महिला आयोगात तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मुंबई**

वकील गुणरत्न सदावर्ते यांची कन्या झेन सदावर्ते हिने मुंबईतील सिद्धिविनायक मंदिर प्रशासनाची राष्ट्रीय महिला आयोगात तक्रार केली आहे. महिलांनी स्कर्ट, शॉर्ट घालून सिद्धिविनायक मंदिरात येऊ नये, असे म्हणणे महिलांसोबत अन्याय आहे. संविधानाच्या तरतुदींची पायमल्ली आहे, असं झेन सदावर्ते हिने तक्रारीत नमूद केलं आहे.

मी झेन सदावर्ते १२ वीत शिकत असून नॅशनल ब्रेवरी अवार्डची विजेती आहे. सिद्धिविनायक मंदिरात महिलांसाठी ड्रेस कोड लागू करण्यात आलाय. भक्तांवर लादण्यात आलेला हा ड्रेस कोड सामाजिकदृष्ट्या चुकीचा आणि भेदभाव करणारा आहे, असं माझं मत आहे. सिद्धिविनायक मंदिरात लागू करण्यात आलेला ड्रेस कोड मुलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारा आहे. शिवाय, भारतासारख्या सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण आणि लोकशाही असलेल्या देशात सर्व नागरिकांना त्यांच्या श्रद्धांचे पालन करण्याची परवानगी असणे, आवश्यक आहे. कपडे घालण्यावरुन सार्वजनिक, धार्मिक ठिकाणी भेदभाव करणे चुकीचे आहे. भक्तांनी त्यांच्या अभिव्यक्तीवर मर्यादा का घालाव्यात?श्रद्धेचा गाभा भक्तीमध्ये आहे, परिधान केलेल्या कपड्यात नाही. मी नम्रपणे विनंती करते की, ड्रेस कोडच्या नियमांचा पुन्हा एकदा विचार करण्यात यावा. मंदिर प्रशासनाने भेदभाव करणाऱ्या या नियमांबाबत सुधारणा केली पाहिजे.

# ७१ लाखांचे अवैध बायोडिझेल टँकरसह जप्त मुंबईच्या पथकाची 'हाय-वे'वर कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बुलढाणा**

स्थानिक महसूल यंत्रणा कुंभकर्णी झोपेत असताना अथवा सोयीस्कर दुर्लक्ष करीत असताना मुंबई येथील दक्षता पथकाने बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर परिसरात महाकारवाई केली. मुंबई नागपूर राष्ट्रीय महामार्ग ५३ वरील कारवाईपूर्वी मलकापूर येथे तळ ठोकून असलेल्या या पथकाने तब्बल ७१ लाख रुपये किंमतीचे अवैध बायोडिझेल, इंधन वाहक टँकर यासह अवैध विक्री केंद्राचे साहित्य जप्त केले आहे. या कारवाईबाबत काटेकोर गुप्तता बाळगण्यात आल्याने मलकापूर येथील महसूल यंत्रणांनादेखील याची कानोकानी खबर लागू देण्यात आली नाही. या कारवाईमुळे मलकापूर महसूल यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून जिल्हाधिकारी किरण पाटील याप्रकरणी काय कारवाई करतात याकडे महसूल यंत्रणेसह जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

मलकापूर नजीकच्या मुंबई नागपूर राष्ट्रीय महामार्ग (५३) वर दोन ठिकाणी राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध पंपावर ही अठ्ठावीस जानेवारीच्या उत्तररात्रीपर्यंत कारवाई करण्यात आली. यानंतर चौदा आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. महामार्गावरील तालसवाडा बस थांबा आणि हॉटेल एकताजवळ अशा दोन ठिकाणी हा गोरखधंदा सुरू होता.

मलकापूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात प्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहे. एका घटनेत ३४.६१ लाख तर दुसऱ्या घटनेत ३६.२८ लक्ष रुपयांचे अवैध बायोडिझेल, वाहने, पंपावरील साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दोन टँकरमधून जमिनीखाली तयार करण्यात आलेल्या टाकीत शेकडो लिटर इंधन खाली करताना रंगेहात पकडण्यात आले.

याप्रकरणी पोलिसांनी कलम ३,७,८ जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५, 'मोटार स्पिरीट ॲण्ड हाय रिपेड डिझेल सदृश्य पेट्रोलियम द्रव पदार्थ (रेगुलेशन ऑफ सप्लाय डिस्ट्रीब्युशन ॲण्ड प्रिव्हेन्शन ऑफ माल प्रक्टिसेस) २००५ मधील कलम २ (ए), २ (ई), २ (एफ), २ (जी), २ (टी) ३ (५) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

# पी. आर. पोटे पाटील शैक्षणिक संस्थेत सांस्कृतिक स्नेहसंमेलन 'उन्मेष-२०२५' उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम ठरले मोठे व्यासपीठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे नुकतेच वार्षिक सांस्कृतिक स्नेहसंमेलन 'उन्मेष २०२५' चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विविध क्लबच्या वतीने आयोजित या स्नेहसंमेलनात सांस्कृतिक, कलात्मक आणि क्रीडा क्षेत्रातील अनेक कार्यक्रमांनी रंगत निर्माण केली.या स्नेहसंमेलनादरम्यान नृत्य, गायन, वादन, नाट्य, वेशभूषा स्पर्धा, तसेच रांगोळी, मेहंदी आणि चित्र रेखाटन स्पर्धा भरवण्यात आल्या. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. यावर्षीची आंतरविभागीय नृत्य स्पर्धा मयूरोत्सव संमेलनाचे मुख्य आकर्षण ठरली. मयूरोत्सव मध्ये वेगवेगळ्या विषयांवर विद्यार्थ्यांनी नृत्याचे जोशपूर्ण सादरीकरण करत विविध पारितोषिके जिंकलीत.



विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे स्वामी विवेकानंद ऑडिटोरियम एक मोठे व्यासपीठ ठरले. विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभेचे यावेळी सादरीकरण केले.या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने महाविद्यालयात पाच दिवसांचा 'आनंद मेळावा' देखील आयोजित करण्यात आला होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारून आपल्या उद्योजकीय कौशल्याचे प्रदर्शन केले.

उन्मेष-२०२५ स्नेहसंमेलनाचे यशस्वी आयोजन डॉ. स्वाती चौधरी, प्रा. प्राची निंभोरकर, प्रा. अमोल चोखट यांनी विद्यार्थी क्लबच्या सहकार्याने केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर, तसेच स्टुडंट्स वेल्फेअर डीन डॉ. एस. के. नंदा तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग होता.

'उन्मेष २०२५' अंतर्गत विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे प्रदान करून त्यांचे मनोबल वाढविण्यात आले. स्नेहसंमेलनाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि एकतेची भावना वृद्धिंगत केली.

# घरात नव्याने तुरीची थप्पी; कमी भावात कसे विकणार?

## दर हमीभावापेक्षा कमी : भाव घसरण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

महिना-दीड महिन्याखाली क्विंटलला ९ हजारांवर भाव आता अडीच-तीन हजारांनी कमी झाला आहे. तुरीच्या खरेदी दरात आणखी घसरण होईल, असे व्यापारी, खरेदीदार सांगतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होणाऱ्या तुरीची घरात थप्पी लावून ठेवावी लागणार आहे. बाजारपेठेत दररोज २०-२५ हजार क्विंटल तूर हमीभावापेक्षा कमी दराने विक्री होत असली, तरी हमीभाव केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव नाही.मागील तीन-चार वर्षात सोयाबीनच्या दरात काही कालावधी सोडला, तर सुधारणा झाली नाही. क्विंटलला चार हजारांच्या वरती असलेल्या दरात फार अशी वाढ झाली नाही. भाव वाढ होत नसल्याने घरात जागा मिळेल तेथे कापूस ठेवावे लागले आता तुरीलाही जागा शोधावी लागत आहे. जे कापसाचेझाले तेच तुरीचे होत आहे. नोव्हेंबर महिन्यात ९ हजार रुपयांपर्यंत तुरीला भाव मिळत होता. त्यामुळे काढणी झालेली तूर थेट विक्रीला जात होती. वरचेवर बाजारात तुरीची आवक वाढेल तसा भावही कमी होत आहे. सहा हजार रुपयांवर भाव आला, तरी हमीभाव केंद्र सुरू करण्याच्या हालचाली दिसत नाहीत.



### दरावर संक्रांत

डिसेंबर महिन्यापर्यंत आठ हजारांपर्यंत असलेला दर जानेवारीत आणखीन कमी झाला आहे. संक्रांतीनंतर आणखीन भाव कमी झाल्याने व होत असल्याने तूर दरावर संक्रांत आली आहे. तर तुरीचे उत्पादन येऊनही शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे पडण्याची अपेक्षा नाही.

# मुंबईकरांचा प्रवास स्वस्तात होणार, परिवहन विभागाची बाईक टॅक्सीला परवानगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मुंबई**

बाईक टॅक्सीबाबत परिवहन विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. ओला, उबेरप्रमाणेच मुंबईत बाईक टॅक्सीला परवानगी देण्यात येणार असून पुढच्या दोन महिन्यात रॅपिडो सारख्या बाईक सर्व्हिस सुरु होणार आहेत. त्यामुळे ट्रॅफिकमध्ये तासंतास अडकून पडण्यावर आता पर्याय निर्माण होणार असून मुंबईकरांचा प्रवासही अधिक जलद आणि स्वस्तात होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. बाईक टॅक्सी सुरु करताना महिला सुरक्षेची विशेष काळजी घेतली जाणार आहे. तसेच बाईक चालकाला मागे प्रवासी बसवताना बाईकच्या मधोमध पार्टिशन लावणे बंधनकारक असेल.

मुंबई शहरात रॅपिडो सारख्या कंपन्यांनी या आधी टॅक्सी बाईक सुरू केल्या होत्या. त्याला प्रवाशांचा प्रतिसादही चांगला होता. पण स्थानिक स्तरावर त्याला रिक्षा आणि टॅक्सीवाल्यांच्या रोषाला सामोरं जावं लागण्याचा अनुभव आला. तसेच त्याबाबत सरकारचे धोरणही स्पष्ट नव्हतं. त्यामुळे या कंपन्यांनी त्यांच्या सेवा बंद केल्या.


# मेळघाट मधील हरिसाल जवळच्या पुलाची दुरावस्था

## काही वर्षांपूर्वी झाले होते सर्वेक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

मेलघाट येथील हरिसाल जवळील सिपना नदीवरील पूल सध्या जीर्ण अवस्थेत असल्याच चित्र सध्या पहावयास मिळत आहे.मात्र या पुलाच्या दुरुस्तीकरिता अजून पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतेही ठोस पावले उचलण्यात आले नाहीत.मेळघाट हे पर्यटन स्थळ असल्याने या ठिकाणी हजारो वाहने ये-जा करतात. मात्र, येथील रस्त्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे





मेळघाट मधील हरिसाल गावानजीक असलेल्या या पुलावरून दररोज लहान मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु असते काही वर्षापुर्वी या पुलाचे सर्वक्षण करण्यात आले होते मात्र त्यानंतर या कडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे या भागातील आदिवासी बांधव सांगतात त्यामुळे या पुलावर कोणत्याही क्षणी मोठा हादसा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे या पुलाची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्यात आयव्ही अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे या मार्गावरून दररोज नागपूर - इंदोर या ट्रॅव्हल्स सुद्धा धावतात. मेळघाटातील धारणी बैतुल नागपूर मार्गावरील दिया गावातील सिपना नदीवर आणि हरिसाल अकोट रस्त्यावरील चिखली गावातील सिपना नदीवरील पुलांची सततची अडचण पाहता या व अशाच इतर पुलांची काही काळापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तपासणी करण्यात आली सर्वेक्षणातून मोठे पूल बांधले जातील, अशी अपेक्षा ग्रामस्थांमध्ये दिसून येत आहे.पावसाळ्यात विविध गावांचा धारणी मुख्यालयाशी संपर्क तुटतो. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या मोठ्या समस्येबाबत काही काळापूर्वी बी अँड सी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह स्थानिक अधिकाऱ्यांनी या छोट्या-छोट्या पुलांचे सर्वेक्षण केले होते. काळाच्या गरजेनुसार मोठे पूल बांधण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय नेत्यांनी याकडे लक्ष देणेही गरजेचे आहे

# कोकण गडकिल्ल्यांसाठी ६ फेब्रुवारीला रेल्वे :२५० रु. तिकीट

## १२ फेब्रुवारीला नवी अमरावती स्टेशनवर परतणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावतीकरांना कोकणातील गडकिल्ले बघता यावेत यासाठी मध्य रेल्वेने धारातीर्थ गडकोट मोहीम २०२५ च्या निमित्ताने अनारक्षित विशेष रेल्वेची सोय केली असून, ही विशेष रेल्वे गाडी ६ फेब्रुवारीला नवी अमरावती अकोली रेल्वे स्थानकावरून दु. ३.३० वाजता रवाना होईल. त्याचप्रमाणे ११ फेब्रुवारीला वीर स्थानकावरून रात्री १० वाजता अमरावतीकडे प्रस्थान करेल. त्यामुळे मधल्या चार दिवसांत अमरावतीकर पर्यटकांना रायगड, अलिबाग, मुरूड जंजिरा, सिंधुदुर्ग असे



किल्ले बघता येतील. या विशेष रेल्वेचे प्रतिव्यक्ती अनारक्षित तिकीट २५० रुपये आहे. ही विशेष ट्रेन जाणे-येणे अशा दोनच फेऱ्या करणार आहे.

०११०१ क्रमांकाची विशेष गाडी ६ फेब्रुवारी रोजी दु. ३.३० वाजता नवी अमरावती अकोली रेल्वे स्थानकाहून प्रस्थान करणार असून, दुसऱ्या दिवशी सकाळी ७.४५ वाजता वीर स्थानकावर पोहोचेल. यादरम्यान ही गाडी बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, पनवेल व रोहा या स्थानकावर थांबा घेईल.

गाडी क्र. ०११०२ ही ११ फेब्रुवारीला रात्री १० वाजता वीर स्थानकावरून निघून दुसऱ्या दिवशी दुपारी १२.३० वाजता नवी अमरावती अकोली स्थानकावर पोहोचेल. मार्गात ती रोहा, पनवेल, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, नांदुरा, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा हे थांबे घेईल.

१६ सामान्य द्वितीय श्रेणी व २ सेकंड सिटींग चेअर कारसह गार्ड ब्रेक व्हॅन अशी या विशेष रेल्वेची संरचना आहे. या गाडीचा लाभ अमरावतीकर शिवप्रेमी, पर्यटकांनी घ्यावा, असे आवाहन मध्य रेल्वेद्वारे करण्यात आले. या गाडीमुळे अमरावतीकर प्रवाशांना राज्यात विविध ठिकाणी जाण्यासाठी अतिरिक्त व स्वस्त पर्याय उपलब्ध झाला आहे. सोबतच छत्रपती शिवरायांनी राज्यात उभारलेले गडकिल्लेही बघता येणार आहेत. बहुतांश गडकिल्ले हे कोकणात आहेत. त्यामुळे ही गाडी वीर स्थानकापर्यंत चालवली जात आहे.

धारातीर्थ गडकोट मोहिमेच्या निमित्ताने कोकणात थेट जाऊन किल्ले बघण्याची अमरावतीकर पर्यटकांना संधी मिळाली आहे. अमरावतीहून विविध प्रसंगी अशा विशेष ट्रेन चालवल्या जात आहेत. त्यामुळे पर्यटकांना विविध ठिकाणी कमी खर्चात जाणे शक्य होत आहे.


**-एम. एस. लोहकरे, स्टेशन प्रबंधक, अमरावती.**

# बुलढाण्यात टक्कल पडलेल्यांना पुन्हा केस; लोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथीसह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बुलढाणा**

देशभरात गाजलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील आकस्मिक केसगळतीच्या साथीवर बुरशी प्रतिबंधक औषधांची मात्रा लागू पडली आहे. टक्कल पडलेल्यांना नवीन केस येत आहेत. परंतु, विविध तपासणी अहवालात मात्र अद्यापही आजाराचे निदान होऊ शकले नाही.

केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या बुलढाणा जिल्ह्यातील १२ हून अधिक गावातील २२२ रुग्णांचे अचानक केस गळायला लागले. ही बातमी देशभर गाजल्यावर भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद



(आयसीएमआर), दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, नागपुरातील क्षेत्रीय आयुर्वेद अनुसंधान संस्था, मुंबईतील होमिओपॅथी संशोधन संस्था, चेन्नईतील सिद्ध सायंस, मुंबईतील युनानी संस्थेतील तज्ज्ञांच्या चमूने संबंधित गावात लोपॅथीसोबतच इतरही पॅथीची औषधे दिली.या क्रमात नागपुरातील क्षेत्रीय आयुर्वेद अनुसंधान संस्थेने सुमारे पाच गावांतील रुग्णांना आयुर्वेदाची मात्रा दिली. यातील बुरशी प्रतिबंधक औषधांचा प्रयोग यशस्वी झाला आहे. त्यामुळे टक्कल पडलेल्या सुमारे १०० नागरिकांच्या डोक्यावर पुन्हा नवीन केस येऊ लागले. अकोल्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील प्रयोगशाळेत गळालेले केस व बायोप्सीचा अहवालही पुढे आला.

# बनावट पीक विमा काढाल तर आधार कार्ड होणार ब्लॉक

## चांगल्या योजनेत व्यत्यय,गैरप्रकार टाळा; कृषी विभागाचे आवाहन

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

बहुतांश शेतकरी इमानेइतबारे योजनेचा लाभ घेतात, तर काही शेतकरी स्मार्ट मोबाइल नसल्याने व त्यातील काही समजत नसल्यामुळे पीकविमाही काढत नाहीत. मात्र, काही बहाद्दर असतात, की ते बनावटपणा करून योजनेचा लाभ घेतात. पण, जिल्ह्यात अद्याप तसे एकही प्रकरण उजेडात आले नाही. पीकविम्यातील गैरप्रकार रोखण्यासाठी बोगस पीक विम्याचा अर्ज निर्दशनास आल्यास संबंधित व्यक्तीचे आधारकार्ड आता ब्लॉक केले जाणार आहे. तसा प्रस्ताव कृषी आयुक्तालयाद्वारा शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे.

जिल्ह्यात गतवर्षी बोगस फळपीक विमा घेणारे सहा जण कंपनीच्या पडताळणीत आढळले होते. यंदा मात्रएकही



### योजनेच्या लाभासाठी पाच वर्षे बंदी आणणार

पीक विमा योजनेत बनावट सहभाग घेणाऱ्या शेतकऱ्याला चाप बसवण्यासाठी आता कृषी विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जाणार आहेत. तसा प्रस्ताव शासनाला पाठवला जात आहे.योजनेत बोगस सहभाग घेतल्यास आता आधारकार्ड पोर्टलमध्ये ब्लॉक केले जाईल. त्या व्यक्तीला किमान पाच वर्षे कृषी विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

बोगस प्रकरण नसल्याची माहिती कृषी विभागाने दिली. मागील हंगामापासून एक रुपयात पीक विम्यात सहभाग घेता येत असल्याने शत - प्रतिशत शेतकरी योजनेचा खरीप व रब्बी हंगामासाठी लाभ घेत आहेत. बोगस सहभाग फळपीक विम्यात आढळून येत आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत अशा प्रकारचे जास्त अर्ज असल्याचे कृषी व पीक विमा कंपनीच्या पडताळणीत आढळून आले आहे. त्यामुळे योजनेला गालबोट लागले आहे. योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी उपाययोजना आखल्या जात आहेत. पीक विमा योजनेत बनावट अर्ज निदर्शनास आल्यास डीबीटी पोर्टलवरून संबंधित व्यक्तीचे आधारकार्ड ब्लॉक होणार आहे.पीकविमा योजनेमध्ये बनावट सहभाग नोंदवल्याचे कृषी विभागाच्या निदर्शनास आल्यास त्या व्यक्तीचे आधारकार्ड महाडीबीटी पोर्टलवर ब्लॉक केले जाणार आहे. याशिवाय अनेक उपाययोजना कृषी विभागाद्वारे केल्या जात आहेत. त्यामुळे बनावट अर्ज करणाऱ्यांना आता चांगलाच चाप बसणार असून अशा बनावटगिरी करणाऱ्यांचे आधार कार्ड ब्लॉक केले जाणार आहे.

# कोर्टाचे मनाई आदेश झुगारून काम करून देण्याचा धरला हट्ट

## वीज खांबावर खाट बांधत , ग्राहकांना व महावितरणला धरले वेठीस
## विलास चर्जन यांच्यावर विद्युत कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती**

वीज खांब स्थलांतर करण्या संदर्भात मा.न्यायालयाचे स्थगनादेश असल्याची माहिती आहे.तसेच सदर काम हे जिल्हा नियोजनातून मंजूर करून प्रशासकीय मान्यता आणि निधीच्या उपलब्धतेसाठी प्रलंबित आहे याचीही माहिती संबंधितांना देण्यात आली. तरीही वीज खांबावर चालू वीज वाहिनीखाली खाट बांधून आंदोलन करून महावितरणला व वीज ग्राहकांना वेठीस धरल्याप्रकरणी सोनोरी (चांदुर बाजार) येथील गृहस्थ विलास चर्जन यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम २२३ आणि विद्युत कायदा २००३ कलम १३८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सोनोरी वार्ड क्रमांक १ सोनोरी येथील उध्दवराव चर्जन यांच्या घराजवळील वीज खांब स्थलांतरीत करण्याबाबत सोनोरी ग्रामपंचायत यांनी लेखी पत्र दिल्यानंतर महावितरणकडून या कामाचे जिल्हा नियोजनातून (DPDC -NDSI २०२४-२५ / दि.२९/११/२४ ) अंदाजपत्रक मंजूर करून प्रशासकीय मान्यता व निधीसाठी प्रलंबित आहे. तथापि, दरम्यान किशोर रामकृष्णपंत मडघे यांच्यातर्फे ॲड .ए.बी.कडू यांच्याकडून वीज खांब स्थलांतरीत करण्याचे हे प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालय अचलपूर यांच्याकडे दाखल झाल्यानंतर मा.न्यायालयाने या कामाला स्थगनादेश दिले.

त्यामुळे मा.न्यायालयाची स्थगिती उठल्यानंतर आणि मंजूर अंदाजपत्रकाचा निधी प्राप्त झाल्यानंतर हे काम करण्यात येईल याची माहिती तक्रारदार विलास चर्जन यांना देण्यात आली, तरीही तक्रारदार विलास चर्जन यांनी वीज खांबावर चालू वीज वाहिनीखाली खाट बांधून त्यावर आंदोलन केले. परिणामी महावितरणला कोणताही अपघात होऊ नये म्हणून त्या वाहिनीवरील वीज पुरवठा बंद करावा लागल्याने इतर ग्राहकांना त्याचा त्रास सहन करावा लागला.

महावितरण कंपनी ही राज्य शासनाचा सामान्य ग्राहकांना वीज पुरवठा करणारा सार्वजनिक उपक्रम आहे. या कंपनीच्या मालमत्तेचा वैयक्तिक कामासाठी दुरूपयोग करणे हा गुन्हा आहे. तसेच अनधिकृतपणे वीज खांबावर चढणे अथवा वीज उपकरणांची छेडछाड करणे यामुळे विद्युत अपघात, जीवित हानी अथवा आरोग्यासाठी आणि सुरक्षेसाठी धोका उत्पन्न होऊ शकतो आणि अशी कृती ही कायदेशिर गुन्हा ठरत असल्याने तक्रारदार विलास चर्जन यांनी वीज खांबावर अनधिकृतपणे चढून खांबावर खाट बांधणे, छत्री उभी करणे, त्यासाठी वीज पुरवठा बंद करण्यात आल्यामुळे इतर ग्राहकांनाही विनाकारण वेठीस धरणे व महावितरणच्या महसुलाचे नुकसान करणे ही कृती भारतीय न्याय संहिता कलम २२३ आणि विद्युत कायदा २००३ कलम १३८ अन्वये गुन्ह्यास पात्र ठरत असल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती महावितरणचे मोर्शी येथील कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट यांनी दिली आहे.

# कोड, पांढरे डाग असणाऱ्यांसाठी वधुवर मेळावा

## कोडावर सर्वात उपयुक्त असणाऱ्या फोटो थेरपी उपचारासाठी महाराष्ट्रात १० सेंटर्स सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर**

श्वेता असोसिएशन ही कोड असणाऱ्या व्यक्तींची आणि त्यांना मदत करणारी स्वयंसेवी संस्था आहे. या संस्थेचे गेल्या २५ वर्षांपासून कार्य सुरू आहे. भारतातील हा पहिलाच स्वमदत गट आहे जो कोड असणाऱ्या व्यक्तींसाठी, त्यांचे आयुष्य सुकर करण्यासाठी काही कामे करीत आहे.

कोड असणाऱ्या व्यक्तींचे समुपदेशन, वधुवर मंडळ, नोकरीविषयक सहायता, डाग झाकोळणारी प्रसाधने उपलब्ध करून देणे, या व्यक्तींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कला प्रदर्शन आयोजित करणे, कोड असणाऱ्या व्यक्तींचा आत्मविश्वास



वाढविण्यासाठी फॅशन शो आयोजित करणे, सभासदांनी अभिव्यक्त व्हावे यासाठी 'रंग मनाचे' वार्षिक प्रकाशित करणे, कोडविषयक जनजागृती आणि कोडाला असणारा सामाजिक कलंक दूर करण्यासाठी जाहीर सभा आयोजित करणे, पुस्तिका, पत्रके छापणे, 'रन फॉर व्हिटिलिगो' मॅराथॉन आयोजित करणे इत्यादी उपक्रम राबवले जातात. चित्रपटांचे जनमानसावर असलेले गारुड लक्षात घेऊन २००६ या वर्षी 'नितळ' या पारितोषिक विजेत्या चित्रपटाची निर्मिती केली. कोडावर सर्वात उपयुक्त असणाऱ्या फोटो थेरपी उपचारासाठी महाराष्ट्रात १० सेंटर्स सुरू केली.वधुवर मंडळ आणि वधुवर मेळावे हा श्वेता असोसिएशनचा सर्वात लोकप्रिय उपक्रम आहे. २००२ साली सुरू झालेल्या या वधुवर मंडळात २८००-२९०० जणांची नोंदणी आहे. ही सेवा अतिशय माफक दरात ऑनलाईन उपलब्ध आहे. ज्यांना स्वतःला पांढरे डाग आहेत किंवा घरात आईवडील किंवा इतर नातेवाईकांना पांढरे डाग आहेत म्हणून लग्नाला अडचणी येत आहेत अशा आणि पांढऱ्या डागांचा बाऊ न करता अशा मुलामुलींशी लग्न करू इच्छिणाऱ्या सर्वांसाठी ही सुविधा उपलब्ध आहे.

रविवार दिनांक २ फेब्रुवारी रोजी, सेवा सदन शिक्षण संथेचे, विमलाबाई जटार सभागृह, उत्तर अंबाझरी मार्ग, मेट्रो स्टेशनजवळ, झांशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर येथे सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत हा वधू - वर मेळावा संपन्न होईल. अधिक माहितीसाठी ८८८८६५४८७ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन संस्थेने केले आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विदर्भ अध्यक्ष पदी नयन मोंढे

## पुणे येथील राज्यस्तरीय बैठकीत सर्व संमतीने झाली निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची राज्यस्तरीय बैठक आणि पदनियुक्त सोहळा पुणे येथील मोरेश्वर सभागृह, निशीगंधा बँक्वेट या ठिकाणी पार पडला मंगळवार(ता.२८) रोजी पार पडला. यावेळी News 18 लोकमतचे ब्युरो चीफ गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्ष पदी तर विदर्भ अध्यक्ष पदी अमरावती येथील



दैनिक विदर्भ मतदारचे नयन मोंढे प्रदेश कार्याध्यक्षपदी निलेश सोमानी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक संजय भोकरे, ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोकराव वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार तथा राजकीय विश्लेषक हेमंत देसाई, पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासाव आरोटे कांबळे यांच्या उपस्थितीत करण्यात आली आहे. नयन मोंढे संघटनेचे सर्वसामान्य सदस्य, जिल्हाध्यक्ष, तसेच पश्चिम विदर्भ अध्यक्ष म्हणून संघटनेत गत १५-१६ वर्षापासून कार्यरत आहेत. विदर्भ अध्यक्षपदी नयन मोंढे यांची नियुक्ती झाल्याने विदर्भातील विविध जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.